भारत देश की सर्वश्रेष्ठ खुशबू
लई भारी ! १ नंबर
परिमल भारतवासी
तसेच मोमेन्टस, इंडियन कस्तुरी, केशर चंदन, खस (वाळा), ब्लु बर्ड, यात्रा, पिंकलोटस, हिना कस्तुरी, शाहीऊद, महालक्ष्मी, शुभलाभ (६ ईन १ पाऊच रु.६० चा ५० मध्ये)
अगरबत्ती चे जिल्हा वितरक व कापुर, शेंदूर, अत्तर, धुप, होलसेल व रिटेल साठी
केवल अगरबत्ती हॉटेल रसरंग समोर, आडते बाजार, अ.नगर.
तसेच ३ फुट पासुन पुढे अल्युमिनीयम लॅडर (शिडी) उपलब्ध

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

अत्याधुनिक नेत्र शिबीर
आता चष्मा घालवा कायमचा
चष्मा नको?
कॉन्टयूरा व्हिजन ❋ मोतिबिंदू ❋ काचबिंदू ❋ नेत्ररोपण
डॉ. कांकरियांचे
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया
❋ शनिवार सकाळी १० ते १ ❋ नांवनोंदणी आवश्यक
साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
Email : saisuryaa85@yahoo.com
www.saisuryasupervision.com
Help line 9112288611 Appointment 8888982222

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, शुक्रवार दि. २६.०४.२०२४ | अंक नं. ०४७ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
खरेदीवर ५% कॅशबॅक ऑफर । बस्ता खरेदीसाठी स्वतंत्र होलसेल विभाग
संगमनेर ✆ (02425) 222226 | अ.नगर ✆ (0241) 2999299 | नारायणगाव ✆ (02132) 242132

# बेदम मारहाण करत केडगावमध्ये खून

## मृतदेह चाँदबीबी महालाजवळ फेकला; सहा जणांवर गुन्हा दाखल

नगर – कार्यक्रमासाठी पत्नीच्या माहेरी केडगाव येथे आलेल्या युवकाला पती – पत्नीच्या वादातून बेदम मारहाण करत त्याचा खून केल्याची घटना उघडकीस आली आहे. खुनानंतर त्याचा मृतदेह चाँदबीबी महालाजवळ बारदरी (ता.नगर) शिवारात फेकून देत पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रकरणी मयताची पत्नी व तिच्या माहेरचे नातेवाईक अशा ६ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी मयताची पत्नी व मेव्हण्याला अटक केली आहे.

प्रशांत जगन्नाथ घाटविसावे (वय २८, रा. केळ पिंपळगाव, ता. आष्टी, जि. बीड) असे मयताचे नाव आहे. तर त्याच्या खून प्रकरणी त्याची पत्नी कल्याणी प्रशांत घाटविसावे (मूळ रा. केळ पिंपळगाव, हल्ली रा. शास्त्रीनगर, केडगाव), सासरा सोमनाथ बनकर, सासू वैशाली सोमनाथ बनकर, मेव्हणा अजय सोमनाथ बनकर, मेव्हणी प्रियंका सोमनाथ बनकर (सर्व रा. शास्त्रीनगर, केडगाव) अजय बनकर चा मेव्हणा मोहित दिनेश पाडळे (रा. बोहरी चाळ, रेल्वे स्टेशन रोड, केडगाव) यांच्या विरुद्ध भा.दं.वि. कलम ३०२, ३२३, १४३, १४७, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. याबाबत मयत प्रशांत घाटविसावे याचा चुलत भाऊ किशोर बापूराव घाटविसावे (रा. केळ पिंपळगाव, ता. आष्टी, जि. बीड) याने नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

मयत प्रशांत घाटविसावे हा मंगळवारी (दि.२३) केडगाव येथे पत्नीच्या माहेरी कार्यक्रमासाठी आलेला होता. रात्री पती – पत्नीच्या वादातून त्याचे व त्याच्या सासरच्या लोकांचे वाद झाले. ही बाब त्याने आपल्या कुटुंबियांना फोन करून कळविली होती. त्यानंतर बुधवारी (दि.२४) त्याच्या कुटुंबीयांनी त्याच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्याचा मोबाईल बंद लागला. गुरुवारी (दि.२५) सकाळपासूनही त्याच्याशी संपर्क न झाल्याने त्याला शोधण्यासाठी त्याचे भाऊ व इतर नगरकडे येत असताना दुपारी त्यांना फोन वर समजले की, प्रशांत याचा मृतदेह चाँदबीबी महालाजवळ बारदरी (ता.नगर) येथे आढळून आला आहे.

त्यामुळे त्याच्या नातेवाईकांनी तेथे धाव घेत पाहिले असता मयत प्रशांत याच्या मृतदेहावर मारहाणीच्या खुणा दिसल्या. त्यामुळे त्याचा चुलत भाऊ किशोर बापूराव घाटविसावे याने गुरुवारी रात्री नगर तालुका पोलिस ठाण्यात मयताची पत्नी व इतर नातेवाईक अशा ६ जणांच्या विरोधात फिर्याद दिली. गुन्हा दाखल होताच स.पो.नि. प्रल्हाद गिते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे, महिला पो.ना. मोहिनी कर्डक, पो.कॉ. विक्रांत भालसिंग, संभाजी बोराडे यांच्या पथकाने मयताची पत्नी कल्याणी प्रशांत घाटविसावे व मेव्हणा अजय सोमनाथ बनकर यांना अटक केली आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे हे करीत आहेत.

स्वतंत्र बंगला विकणे आहे
उत्तम कंडीशन, पुर्णवेळ पाणी, शहरालगत
1000 स्के. फुट प्लॉट व 1000 स्के.फुट कन्स्ट्रक्शन्स
असलेला 1 बीएचके बंगला विकणे आहे.
वाघमळा, मॅजिस्ट्रिक टॉवर समोर, महापौर वाकळे बंगला परिसर, सावेडी, अ.नगर
मो. 9960868888

DISHA
MAHA DISCOUNT offer
JOIN TODAY
Just in 1800 Any Course
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY PRIME
PHOTOSHOP, CORELDRAW, ILLUSTRATOR
INDESIGN, C, C++, HTML, 2D CAD, 3D CAD
Delhi Gate Branch 9371051769 | Old ST stand Branch 9371151769 | Pipeline Branch 7447761769



महाविकास आघाडीच्या पत्रकार परिषदेत माहिती देताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, माजी आमदार दादाभाऊ कळमकर, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रा. शशिकांत गाडे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जयंत वाघ, शहराध्यक्ष किरण काळे, आम आदमी पक्षाचे सुभाष केकाण आदी.

# पराभव दिसू लागल्याने विखेंनी उभा केला ‘डमी निलेश लंके’

## महाविकास आघाडीचा आरोप; विखेंच्या डमी कारभाराची केली पोलखोल

नगर – महायुतीचे उमेदवार सुजय विखे यांच्या पुढे महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांनी निवडणुकीत मोठे आव्हान उभे केल्याने विखेंच्या पायाखालची वाळू सरकू लागली आहे. कदाचित पराभव समोर दिसू लागल्याने विखेंनी आता नेहमीप्रमाणे डमीची खेळी सुरु केली असून दुसरा निलेश लंके उभा केला असल्याचा आरोप महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षांच्या जिल्हाध्यक्षांनी शुक्रवारी (दि.२६) पत्रकार परिषदेत करत विखेंच्या डमी कारभाराची पोलखोल केली.

नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाची निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी निलेश साहेबराव लंके नावाने दाखल झालेल्या अर्जाची पोलखोल महाविकास आघाडीने नगर राष्ट्रवादी भवन येथे पत्रकार परिषद घेऊन केली आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, माजी आमदार दादाभाऊ कळमकर, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख प्रा. शशिकांत गाडे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जयंत वाघ, काँग्रेसचे शहराध्यक्ष किरण काळे, आम आदमी पक्षाचे सुभाष केकाण, उद्धवराव दुसुंगे, संपतराव म्हस्के, दशरथ शिंदे, विलास उबाळे आदीसह महाविकास आधाडीचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश ज्ञानदेव लंके यांची वाढती लोकप्रियता भाजपा उमेदवार सुजय विखे यांची भीती वाढवणारी आहे. सुजय विखे यांचे नोटरी आणि त्यांच्यासाठी स्टॅम्प घेणारा व्यक्ती हा उभा केलेला डमी उमेदवार निलेश साहेबराव लंके यांच्यासाठी देखील स्टॅम्प घेतो हा योगायोग की नियोजित प्रकार आहे? ५० वर्षे विखे कुटुंबाने डमी कारभार केला. सुजय विखे यांची डिग्री देखील कशी आहे याबाबत त्यांचे काका अशोक विखे यांनीच सांगितले आहे. संपत्तीसाठी डमी भाऊ कुणी उभा केला व तलाठी भरती मध्ये डमी कारभार झाला हे सर्वज्ञात आहे.

### शासकीय यंत्रणेचा केला गैरवापर

५० वर्षाची सत्ता असणारे विखे कुटुंब यांनी सामान्य कुटुंबातील निलेश लंके यांची धास्ती घेणे यातच सर्वकाही सामावले आहे. निलेश साहेबराव लंके हा कामोठे येथील व्यक्ती जानेवारी पर्यंत निघोजच्या मतदार यादीत नसताना देखील अचानक दोन नावे मतदार यादीत येतात. यासाठी शासकीय यंत्रणा किती तत्पर आहे, असा उपरोधिक टोला या पदाधिकाऱ्यांनी लगावला. डमी उमेदवार उभा करणे हे पराभवाची मानसिकता समोर आणणारे आहे. शरद पवार यांनी नगर येथील सभेत एक गौप्यस्फोट केला, त्यात विखे यांनी पंधरा दिवस अगोदर आपल्याकडे एक उद्योगपती पाठवून निलेश लंके यांना उमेदवारी देऊ नका दुसरे कुणीही द्या असे सांगितले होते. याचा अर्थ विखे घाबरलेले आहेत.

### आमच्याकडेही सुजय विखे नावाचे २ जण होते

नावात साधर्म्य असणाऱ्या माणसाचा वापर करून शेवटी पाठिंबा देऊन घेणे, डमी नावाने बातम्या देणे, आरोप करणे, अशा डमी उमेदवाराचा गैरवापर करने अशी हतबलता विखे यांची दिसते आहे. आमच्याकडे देखील सुजय विखे नावाचे दोन उमेदवार संपर्कात होते, मात्र आम्ही अर्ज दाखल केले नाही. जर विजयाची खात्री असेल तर नावाचे साधर्म्य असणारे उमेदवार दाखल करण्याची गरज नाही. विखेंना पराभव दिसत असल्यामुळे कदाचित असा प्रकार त्यांनी केला असावा असा आरोप महाविकास आघाडीच्या वतीने केला गेला आहे.

महिलांसाठी मोफत आरोग्य शिबिर
(रविवार, दि. २८ एप्रिल २०२४ रोजी सकाळी १० ते संध्या. ६)
गरोदर माता व सर्व वयोगटातील महिला व मुलींची
मोफत आरोग्य तपासणी, सल्ला व मार्गदर्शन
शिबिरात सहभागींना सोनोग्राफीवर 50% सूट
नॉर्मल डिलिव्हरी रु.9,500/-, सिझेरियन रु.20,500/-
शिबिराचे ठिकाण :- जगताप हॉस्पिटल व प्रसुतिगृह
पुणे बसस्टँडजवळ, स्वस्तिक चौक, हॉटेल रेडियन्सच्या पाठीमागे, अहमदनगर.
मो. 74105 94116, फोन (0241) 7961062.

सरकारमान्य संस्था घरबसल्या बाराही महीने विविध पॅकिंगचे व्यवसाय करा..
रोज ५०० ते १००० रु. कमवा (माल फ्री घरपोहोच)
धनश्री उद्योग
अंबर प्लाझा बेसमेंट, नमो मेडिकलच्या खाली, माळीवाडा एस.टी. स्टँण्ड समोर, अ.नगर.
7066575497

॥ कुलस्वामिनी प्रसन्न ॥
शेअरिंग कॅब डेली सर्व्हीस
नगर-पुणे-नगर
आता आपल्या शहरातुन
दररोज
नगर येथून स. ७,८,९ व दुपारी २.००
पुणे येथून स.११,१२,२ व सायं.५ वा
Ac Xccent / WegonR / Dzire
प्रत्येक वेळेस निरजंतुकीकरण
मर्यादित ३ सिट्स
बुकिंग आवश्यक
अमर-प्रेम हॉलिडेज
9657746555/ 9226399555

कमी ऐकू येते का ?
signia Life sounds brilliant.
कंपनीचे अधिकृत विक्रेते
● न दिसणारे डिजीटल श्रवण यंत्र
● ३१ वर्षापासून सेवेत
● इंग्लडमधील अनुभव असलेले ऑडिओलॉजिस्ट
● लहान मुलांच्या तपासण्या ● स्पीच थेरपी
स्थापना : १९९२
साई हिअरिंग क्लिनिक
15% Discount
साई सर्जिकल ॲण्ड हिअरिंग सर्व्हिसेस
मुख्य शाखा : कोहिनूर प्लाझा (बेसमेंट), पत्रकार चौक, लोकमत भवन शेजारी, अहमदनगर.
फोन : 0241 - 2429795. मो. 83800 41240
शाखा नं. १ : शॉप नं. १५, डी.पी. रोड, शिवतारा गार्डन, गणेश सोसायटी, चैतन्यनगर, कोथरुड, पुणे. मो. 9028075405
वेळ : सकाळी १० ते सायं. ७ (रविवार बंद)

Guru SUPERMARKET
RICE FESTIVAL
तांदूळ महोत्सव
एकापेक्षा एक.. दर्जेदार व्हरायटी अनेक!

| तांदूळ | वजन | जुनी किंमत | नवी किंमत |
|---|---|---|---|
| आंबेमोहोर | 5kg | 450/- | 399/- |
| मदर इंडिया | 5kg | 350/- | 305/- |
| इंद्रायणी | 5kg | 320/- | 290/- |
| चिन्नोर | 5kg | 370/- | 320/- |
| कोलम डायमंड | 5kg | 425/- | 375/- |
| कोलम नॉनस्टिम | 5kg | 435/- | 385/- |
| काली मूछ | 5kg | 395/- | 345/- |
| सेला बासमती | 5kg | 420/- | 370/- |
| बासमती गुरु डायमंड | 5kg | 800/- | 740/- |
| कोलम कणी | 5kg | 285/- | 235/- |
| मिनी मोगरा | 5kg | 330/- | 290/- |
| उकडा (बॉइल्ड) | 5kg | 280/- | 240/- |

ब्राउन राईस ( हातसडी) ब्राउन बासमती
गुरु सुपरमार्केट Since 2013 माऊली संकुलसमोर
झोपडी कॅन्टीन मागे, अहमदनगर
फोन :0२४१-२४१७५७५
सोमवार बंद!



अनुभवा पूर्ण नवीन
रेमंड शॉप
अहमदनगर येथे
चला, रेमंडच्या नवीन शोरुम ला भेट द्या सावेडी रोड, अहमदनगर येथे.
आमची फाइन फॅब्रिक्सची नवी श्रेणी पहा, रेडिमेड कलेक्शनमधून मनपसंत निवड करा आणि टेलरिंग ची कमाल अनुभवा.
THE Raymond SHOP
माऊली आर्केड, झोपडी कॅन्टीन जवळ, सावेडी रोड, अहमदनगर ✆0241-6611143

दर्जेदार फ्लेक्स प्रिंटींग संपर्क : 9403232323

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## प्रबळ इच्छाशक्ती आणि कलासक्ती

भारतीय शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रातले पितामह बडे गुलाम अली खाँ यांचे कला संगीत जीवन अद्भूत असेच.

१९६१ मध्ये बडे गुलामत अली खाँ यांना पक्षाघाताचा झटका आला. त्यावेळी डॉक्टरांनी सांगितले की यापुढे ते गाऊ शकणार नाही. खाँ साहेबांनाही हा फार मोठा धक्का होता. कारण गाणं त्यांचा प्राण होता. आयुष्य होते. दोन वर्षांच्या तळमळीनंतर त्यांनी एक दिवस आपल्या मुलाला स्वरमंडल (वाद्यवृंद) घेऊन बोलावलं अन् शेजारी बसायची खूण केली. उजव्या हातानं त्यांनी स्वरमंडल छेडायला सुरुवात केली. डोळे मिटून स्वर देण्याचा प्रयत्न केला. बऱ्याचदा त्यांच्या घशातून विचित्र आवाज येत राहिला. पण त्यांनी हार मानली नाही. खूप वेळानंतर त्यांना हवा तसा षट्ज लागला आणि हळूहळू भैरव रागातली 'ओ करतार' ही चीज त्यांच्या पूर्वीच्याच सुरेल कंठातून रेशमाच्या सरी उलगडाव्यात तशी हळुवार उलगडत गेली. त्याच दिवशी खाँ साहेबांना आणि संगीत रसिकांनाही त्यांचा लखलखता स्वर परत मिळाला. पुढे बडे गुलाम अली खाँ यांच्या जाहीर मैफिलीही झाल्या. असे कलासक्त व प्रबळ इच्छाशक्ती, साधना करणारे कलाकारांनी भारतीय कला संस्कृतीला सन्मानित केलेले आहे.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१



# 'ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी' पडताळणीशी संबंधित सर्व याचिका सुप्रिम कोर्टाने फेटाळल्या

## बॅलेट पेपरद्वारे निवडणुका घेण्यासही नकार; व्यवस्थेवर अनावश्यक अविश्वास योग्य नाही

नवी दिल्ली – ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी स्लिप्सच्या १००% क्रॉस चेकिंगची मागणी करणाऱ्या सर्व याचिका सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी फेटाळल्या. याशिवाय बॅलेट पेपरद्वारे मतदान करण्याचा सल्ला देणारी याचिकाही फेटाळून लावली. या प्रकरणाची सुनावणी करणारे न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपंकर दत्ता म्हणाले की, एखाद्या यंत्रणेवर आंधळेपणाने विश्वास न ठेवल्याने अनावश्यक शंका निर्माण होऊ शकतात. आम्ही प्रोटोकॉल, तांत्रिक बाबींवर तपशीलवार चर्चा केली आहे.

सिम्बॉल लोडिंगची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, सिम्बॉल लोडिंग युनिट सील केले पाहिजे. सिम्बॉल लोडिंग युनिट ४५ दिवसांसाठी साठवले पाहिजे. उमेदवारांच्या आवाहनावर निकालानंतर अभियंत्यांची एक टीम मायक्रोकंट्रोलर ईव्हीएममधील बर्न मेमरी तपासेल. हे काम निकाल जाहीर झाल्यापासून ७ दिवसांच्या आत केले पाहिजे. त्याचा खर्च उमेदवाराला करावा लागेल.

यापूर्वी २४ एप्रिल रोजी ४० मिनिटांच्या सुनावणीनंतर खंडपीठाने निर्णय राखून ठेवला होता. न्यायमूर्ती संजीव खन्ना म्हणाले होते की, आम्ही गुणवत्तेवर पुन्हा सुनावणी करत नाही. आम्हाला काही निश्चित स्पष्टीकरण हवे आहे. आम्हाला काही प्रश्न पडले आणि त्यांची उत्तरे मिळाली. निर्णय राखून ठेवत आहे.

अरुण कुमार अग्रवाल यांनी ऑगस्ट २०२३ मध्ये व्हीव्हीपीएटी स्लिपच्या १००% पडताळणीबाबत याचिका दाखल केली होती. मतदारांना व्हीव्हीपीएटी स्लिपची प्रत्यक्ष पडताळणी करण्याची संधी द्यावी, असे याचिकेत म्हटले आहे. मतदारांना त्यांच्या स्लिप मतपेटीत स्वतः टाकण्याची सोय असावी. त्यामुळे निवडणुकीत अनियमितता होण्याची शक्यता संपुष्टात येईल. या खटल्यात याचिकाकर्त्यांतर्फे प्रशांत भूषण, गोपाल शंकरनारायण आणि संजय हेगडे हे वकील हजर आहेत. प्रशांत असोसिएशन ऑफ डेमोक्रॅटिक रिफॉर्म्सचे आहेत. त्याचवेळी, आतापर्यंत निवडणूक आयोगाच्या वतीने अधिवक्ता मनिंदर सिंग, अधिकारी आणि केंद्र सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता उपस्थित होते.

यापूर्वी १८ एप्रिल रोजी न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपंकर दत्ता यांच्या खंडपीठाने वकील आणि निवडणूक आयोगाचा ५ तास युक्तिवाद ऐकून निर्णय राखून ठेवला होता. मतदानानंतर मतदारांना व्हीव्हीपीएटी स्लिप देता येणार नाही का, असा प्रश्न न्यायालयाने निवडणूक आयोगाला गेल्या सुनावणीत विचारला होता. यावर निवडणूक आयोगाने म्हटले होते की, मतदारांना व्हीव्हीपीएटी स्लिप देण्यात मोठा धोका आहे. यामुळे मताच्या गोपनीयतेशी तडजोड होईल आणि बूथच्या बाहेर त्याचा गैरवापर होऊ शकतो. इतर लोक ते कसे वापरू शकतात हे आम्ही सांगू शकत नाही.

न्यायालयाने ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटीची संपूर्ण प्रक्रिया निवडणूक आयोगाच्या वकिलांकडून समजली आहे. तसेच निवडणूक प्रक्रियेचे पावित्र्य राखले पाहिजे, असे सांगितले. हे घडायला हवे होते आणि झाले नाही यात शंका नाही. यानंतर न्यायालयाने निर्णय राखून ठेवला.

१६ एप्रिल रोजी झालेल्या सुनावणीत सुप्रीम कोर्टाने भूषण यांना सांगितले होते – येथे जर्मनीची उदाहरणे चालत नाहीत

१६ एप्रिल रोजी झालेल्या सुनावणीत वकील प्रशांत भूषण यांनी मतपेटीत व्हीव्हीपीएटी स्लिप टाकल्या पाहिजेत असा युक्तिवाद केला. जर्मनीतही असेच घडते. त्यावर न्यायमूर्ती दीपंकर दत्ता म्हणाले की, तिथली उदाहरणे इथे चालत नाहीत. याशिवाय, न्यायालयाने निवडणूक आयोगाला ईव्हीएमच्या निर्मितीपासून ते स्टोअरेज आणि डेटा टेम्परिंगच्या शक्यतेपर्यंत सर्व काही सांगण्यास सांगितले होते.

### सध्या फक्त ५ ईव्हीएम मते व्हीव्हीपीएटी स्लिपशी जुळतात

सध्या कोणत्याही मतदारसंघात केवळ ५ ईव्हीएम मते व्हीव्हीपीएटी स्लिपशी जुळतात. याचिकेत म्हटले आहे की निवडणूक आयोगाने अंदाजे २४ लाख व्हीव्हीपीएटी खरेदी करण्यासाठी ५,००० कोटी रुपये खर्च केले आहेत, परंतु केवळ २०,००० व्हीव्हीपीएटी स्लिपची मतांसह पडताळणी केली जात आहे.

२०१४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतात व्हीव्हीपीएटी मशिनचा पहिल्यांदा वापर करण्यात आला. हे इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड आणि भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड यांनी बनवले आहे.



कंबरेला गावठी पिस्तूल लावून फिरणाऱ्याला पकडल्यानंतर त्याच्या समवेत भिंगार कॅम्पचे स.पो.नि. योगेश राजगुरु, पोलीस अंमलदार रेवणनाथ दहिफळे, कैलास सोनार, संदिप घोडके, दिपक शिंदे आदी.

# कंबरेला पिस्तूल लावून फिरणाऱ्याला बुऱ्हाणनगर रोडवर पोलिसांची पकडले

नगर – कंबरेला गावठी पिस्तूल लावून फिरणाऱ्याला भिंगार कॅम्प पोलिसांच्या पथकाने बुऱ्हाणनगर रोडवर असलेल्या दमडी मशिद जवळ पकडले आहे. त्याच्या कडून एक गावठी पिस्तूल आणि २ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. जाबीर सादिक सय्यद (वय–३४, रा. घर नं.–६ शहा कॉलनी, गोविंदपुरा, अहमदनगर) असे या आरोपीचे नाव आहे.

भिंगार कॅम्पचे सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश राजगुरु यांना गुरुवारी (दि.२५) सायंकाळी गोपनीय माहिती मिळाली की, एक इसम त्याचे कंबरेला गावठी कटटा लावुन बुऱ्हाणनगर रोडवरील दमडी मशिद जवळ संशयास्पद फिरत आहे. ही माहिती मिळताच त्यांनी गुन्हे शोध पथकातील अंमलदारांना तात्काळ सदर ठिकाणी जावुन कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार पथकाने दमडी मशिदजवळ जावुन पाहणी केली असता तेथे जाबीर सादिक सय्यद संशयास्पद फिरतांना दिसुन आल्याने त्यास जागीच ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेतली असता त्याचे अंगझडतीत कंबरेला खोचलेला एक गावठी बनावटीचा कटटा व दोन जिवंत काडतुस आढळून आले. ते जप्त करत त्याच्या विरोधात भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात आर्म ॲक्ट ३/२५ सह महाराष्ट्र पोलिस कायदा कलम ३७ (१) (३) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधिक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधिक्षक प्रशांत खैरे,उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांचे मार्गदर्शनाखाली सहा. पोलिस निरीक्षक योगेश राजगुरु, पोलीस अंमलदार रेवणनाथ दहिफळे, कैलास सोनार, संदिप घोडके, दिपक शिंदे यांच्या पथकाने केली आहे.

# महिन्यांपासून अनियमित पाणी पुरवठा; ऐन उन्हाळ्यात नागरिकांना पाण्यासाठी भटकंती



## पुरवठा सुरळीत करावा अन्यथा आंदोलन करणार : भगवान फुलसौंदर

नगर – गेल्या एक महिन्यांपासून ऐन उन्हाळ्यात नागरिकांच्या नळाला पाणी येत नसून, पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. ऐन निवडणुकीत लोकशाहीचा उत्सव, सणासुदीचे दिवस, लग्न सराई, उष्णाता यामुळे या दिवसात पाण्याची गरज जास्त असते. त्यातच मनपाने पाणी कपात केली आहे. नागरिक खाजगी टँकरद्वारे पाण्याची गरज भागवत आहेत, तेही नियमित मिळत नाहीत. परिसरातील सर्व नागरिक हे नियमित कर भरणारे आहेत. पाणी वितरण व्यवस्था सुरळीत न झाल्यास नागरिकांसमवेत जन आंदोलन करण्यात येईल, असेही निवेदनात म्हटले आहे.

प्रभाग १४ मधील बुरुडगांव रोड, नक्षत्र लॉन, विनायकनगर, फुलसौंदर मळा, समता कॉलनी, आंचल विहार, वसंत विहार, अहिंसानगर, एकाडे मळा येथे अनियमित पाणी पुरवठा होत आहे. याबाबत मनपा आयुक्तांना निवेदन देऊन पाणी पुरवठा सुरळीत करावा, अन्यथा आंदोलनाचा इशारा माजी महापौर भगवान फुलसौंदर यांनी दिला आहे.

# नालेगावात घरफोडी करत सोन्याचे दागिने पळविले

नगर– शहरातील नालेगाव परिसरात असलेल्या दातरंगे मळा येथे अज्ञात चोरट्याने घरफोडी करत घरातील कपाटात ठेवलेल्या सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना मंगळवारी (दि.२३) सकाळी ९ ते बुधवारी (दि.२४) सायंकाळी ६ या दरम्यान घडली.

याबाबत कांचन राहुल पटेकर (रा. दातरंगे मळा, नालेगाव) यांनी गुरूवारी (दि.२५) दुपारी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या खाजगी नोकरी करत असून अज्ञात चोरट्याने त्या बाहेरगावी गेल्याचे पाहून त्यांच्या घरात घुसून सर्वत्र उचकापाचक केली. घरातील कपाटाचे कुलूप कशाच्या तरी साह्याने तोडून कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने चोरून नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरूध्द भा.दं.वि. कलम ३८०, ४५७, ४५४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.





विद्युत वितरण कार्यालयासमोरील गेल्या अनेक दिवसांपासून तुंबलेल्या ड्रेनेज लाईनचे काम माजी नगरसेवक अविनाश घुले यांनी स्वत: उभे राहून मनपा आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून पुर्ण करुन घेतले.

## जगन्नाथ खांदवे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – सांडवा (ता.नगर) येथील रहिवासी जगन्नाथ खंडु खांदवे (वय ९०) यांचे २५ एप्रिल रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर गावच्या अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे १ मुलगा, ४ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. नगर येथील दिल्लीगेट जवळील श्रीपाद मेडिकलचे संचालक देवीदास खांदवे यांचे ते वडील होत.

## प्रा. डॉ. वसंत हेबाळकर यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – प्रा. डॉ. वसंत हेबाळकर यांचे २४ एप्रिल रोजी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले.



येथील विद्या प्रतिष्ठान संचालित बी.एड. कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून २५ वर्षे कार्यरत होते. त्यांची लहान मुलांसाठीची कविता आणि गोष्टींची पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. निवृत्तीनंतरही त्यांचा लिखाणाचा छंद जोपासत त्यांनी गुजराथी दत्तबावनीचे मराठीत भाषांतर करुन त्याचे पुस्तक प्रसिद्ध केले.

वयाच्या नव्वदाव्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पश्चात १ मुलगा, सुन, ३ मुली, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.

## मंगल हारदे यांचे अल्पश: आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील मंगल चांगदेव हारदे (वय ६५) यांचे अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. नेवासारोड येथील सायली बुक स्टॉलचे मालक प्रवीण हारदे व अजित हारदे यांच्या मातोश्री होत.

## बाळासाहेब जैत यांचे अल्पश: आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील बाळासाहेब मुरलीधर जैत (वय ७१) यांचे अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, दोन मुले, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे.

दत्तात्रय जैत यांचे धाकटे बंधू, नानाज् केटरर्सचे मालक अमोल जैत व वैभव जैत यांचे वडील होत.

## नगर–दौंड रोडवर अपघातात एका जणाचा मृत्यू

नगर– नगर– दौंड रोडवर हिवरे झरे (ता.नगर) शिवारात रस्त्यात उभ्या केलेल्या मालवाहू गाडीला मोटारसायकल धडकून झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाला आहे. किरण मोहन कापसे (वय ४३, रा.गजानन वाडी, श्रीगोंदा रोड, काष्टी) असे मयताचे नाव आहे.

मयत कापसे हे बुधवारी (दि.२४) दुपारी १ च्या सुमारास दौंड रोडने नगरकडे येत असताना हिवरे झरे (काळेवाडी) शिवारात अशोक लेलंड कंपनीची मालवाहू गाडी चालकाने निष्काळजीपणे रस्त्यातच थांबवली. त्यामुळे कापसे यांच्या मोटारसायकलची मालवाहू गाडीला पाठीमागून जोराची धडक बसली. या धडकेत कापसे हे गंभीर जखमी होवून रस्त्यावर पडले. त्यांना नागरिकांनी रूग्णवाहिका बोलावून नगरच्या जिल्हा शासकीय रूग्णालयात उपचारार्थ पाठविले. मात्र डॉक्टरांनी त्यांना उपचारापूर्वीच मयत घोषित केले.

याबाबत मयत कापसे यांचा भाचा ऋषिकेश अशोक म्हस्के (वय–२६, रा. निंबळक, ता. नगर) यांनी गुरूवारी (दि.२५) रात्री नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी मालवाहू गाडी चालक हेमंत कैलाससिंह चौहान (रा. धरमपुरी, मध्यप्रदेश) याच्या विरूध्द भा.दं.वि. कलम ३०४ (अ), ३३७, ३३८, ४२७, २८३, मोटार वाहन कायदा कलम १८४, १८७ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# मुख्य वीज वितरण कार्यालयाजवळील ड्रेनेज लाईनचे साफसफाईचे काम सुरू

## नगरसेवक अविनाश घुले यांनी दाखविलेल्या तत्परतेबद्दल नागरिकांनी मानले आभार

नगर – नगर कॉलेज जवळ, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळ कार्यालयासमोर हाजी हसन शहा कादरी कब्रस्तानच्या गेट समोर ड्रेनेज चेंबर पूर्णपणे भरल्याने त्यामधून घाण पाणी गेल्या अनेक दिवसांपासून रस्त्यावर वाहत होते. याबाबत माजी नगरसेवक अविनाश घुले यांना याबाबत कळाल्यानंतर त्यांनी स्वत: त्या ठिकाणी जात तातडीने मनपाचे स्वच्छता निरीक्षक यांना संबंधित ठिकाणी बोलावून परिस्थितीची माहिती देत तुंबलेले ड्रेनेज तातडीने दुरुस्त करण्याचे आदेश दिले. त्यानंतर सफाई कामगारांनी उपाययोजना राबवून ड्रेनेज लाईन साफ करुन दुरुस्ती केल्याने रस्त्यावर येणारे घाण पाणी थांबले. नगरसेवक अविनाश घुले यांनी दाखविलेल्या तत्परतेबद्दल परिसरातील नागरिकांनी यांचे आभार मानले.

एसबीआय, जिल्हाधिकारी कार्यालय, हातमपुरा आदि भागातून ही ड्रेनेज लाईन येत असल्याने तसेच दोन दिवसांपुर्वी झालेल्या अवकाळी पावसाच्या पाण्याबरोबरच या ड्रेनेज लाईनमध्ये कचरा, घाण अडकली होती. त्यामुळे विद्युत महामंडळासमोरच चेंबर तुंबल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. तसेच या भागात असलेल्या कब्रस्तान असल्याने नेहमीच या ठिकाणी वर्दळ असते. त्यामुळे त्यांनाही रस्त्यावरुन वाहणार्या घाण पाण्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत. याबाबत मनपात तक्रार देखील केली, परंतु योग्य दखल घेण्यात आली नाही. तेव्हा अविनाश घुले यांना याबाबत कळविल्यानंतर त्यांनी तातडीने मनपा यंत्रणा कामाला लावत स्वत: उभे राहून हे काम पुर्णत्वास नेले. यावेळी आरोग्यविभागाचे राजेश तावरे, बोरगे, दीपक गायकवाड आदी उपस्थित होते.

## पानटपरीवर छापा टाकून सुगंधी मावा पकडला

नगर– सावेडी उपनगरातील आकाशवाणी केंद्रासमोर असलेल्या बालाजी पान शॉप या ठिकाणी नगर शहर विभागाचे पोलिस उपअधिक्षक अमोल भारती यांच्या विशेष पथकाने छापा टाकत १६ हजार ८२० रूपये किंमतीचा सुगंधी तंबाखू पासुन तयार केलेला मावा पकडला आहे. गुरूवारी (दि.२५) सायंकाळी कारवाई करण्यात आली.

बालाजी पान शॉप या टपरीत सुगंधी तंबाखू पासून मावा तयार करून त्याची विक्री केली जात असल्याची माहिती पोलिस उपअधिक्षकांच्या पथकाला मिळाली होती. त्यानुसार त्यांनी छापा टाकून कारवाई करत टपरी चालक शंकर कालीदत्त कांबळे (रा. अयोध्यानगर, भुषणनगर, केडगाव) याच्या विरूध्द तोफखाना पोलिस ठाण्यात भा.दं.वि. कलम १८८, २७२, २७३ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई उपअधिक्षक अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक दत्तात्रय शिंदे, पो.हे.कॉ. सुयोग सुपेकर, राजु जाधव, पो.ना. हेमंत खंडागळे, महेश मगर, पो.कॉ. सागर द्वारके, महिला पो.कॉ. भालेराव यांच्या पथकाने केली आहे.

# नगर शहरात गांजाची विक्री करताना एकाला पकडले

## ८६ हजारांचा साडे आठ किलो गांजा जप्त; खिस्त गल्लीत कारवाई

नगर – नगर शहरात खिस्त गल्ली येथे राहत्या घरात गांजाचा साठा करून तो विक्री करणाऱ्याला स्थानिक गुन्हे शाखा व कोतवाली पोलिसांच्या पथकाने पकडले आहे. मतीन बशीर शेख (वय ४५, रा. जुना बाजार, खिस्तगल्ली, अहमदनगर) असे त्याचे नाव असून त्याच्या घरातून ८६ हजार ६५० रुपये किमतीचा ८ किलो ६६० ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला आहे.



नगर शहरात खिस्त गल्ली येथे राहत्या घरात गांजाचा साठा करून तो विक्री करणाऱ्याला पकडल्या नंतर त्याच्या समवेत पोलिसांचे पथक.

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.दिनेश आहेर यांना नगर जिल्ह्यातील अवैध धंद्याची माहिती काढुन त्यांचे विरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार पो.नि.आहेर यांनी अवैध धंद्यांवर कारवाई साठी स्थानिक गुन्हे शाखेतील स.पो. नि.हेमंत थोरात व अंमलदार संदीप पवार, संतोष खैरे, रविंद्र घुंगासे, जालिंदर माने, विशाल तनपुरे व भाग्यश्री भिटे यांचे पथक नेमलेले आहे.

सदर पथक नगर शहर हद्दीत अवैध धंद्दे करणाऱ्या इसमांची माहिती काढत असतांना गुरुवारी (दि.२५) सायंकाळी स.पो.नि.हेमंत थोरात यांना जुना बाजार, ख्रिस्तगल्ली, येथे एक जण घरात गांजाचा साठा करून त्याची विक्री करत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानंतर पथकाने तात्काळ कोतवाली पोलीस स्टेशन येथे जावुन पो.नि.प्रताप दराडे व पथका सोबत छाप्याचे नियोजन केले.

या संयुक्त पथकाने जुना बाजार, ख्रिस्तगल्ली येथील मतीन शेख याच्या घरात छापा टाकला असता त्याच्या कडे कॉटखाली एका गोणीत सुमारे ८६ हजार ६५० रुपये किमतीचा ८ किलो ६६० ग्रॅम गांजा आढळून आला. तो जप्त करुन आरोपी मतीन शेख विरुध्द कोतवाली पोलीस ठाण्यात गुंगीकारक औषधी द्रव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ कायदा सन १९८५ चे कलम ८ (क), २० (ब) (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### आहारावर त्वचेचे आरोग्य अवलंबून

आपल्याला सगळ्यांनाच, आपली त्वचा अतिशय सुंदर, नितळ, निरोगी असावी असे वाटत असते. त्यासाठी आपण नाना प्रकारचे उपाय ही वेळोवेळी करीत असतो. पण त्वचेची सुंदरता ही आनुवंशिक असते, आणि त्याशिवाय त्वचा नितळ आणि सुंदर ठेवण्यासाठी त्वचेची योग्य निगा राखणे देखील आवश्यक आहे. आपल्या त्वचेचे आरोग्य आणि आपला आहार यांचा थेट संबंध आहे हे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. आपण आपल्या आहारामध्ये समाविष्ट केलेले काही पदार्थ आपल्या त्वचेकरिता हानिकारक ठरू शकतात.

## पाककला

### आलू-कॉर्न पॅटीस

**साहित्य** - ३ उकडलेले बटाटे, १ कप मक्याचे उकडलेले दाणे थोडे ठेचून, १ स्लाईस ब्रेड, लागल्यासच थोडे कॉर्नफ्लोअर, १ कांदा, १ सिमला मिरची बारीक चिरून, मीठ व आले, मिरचीचे वाटण चवीनुसार.

**कृती** - ब्रेड स्लाईस कुस्करून घ्यावे. बटाटे सोलून किसून घ्यावे. सर्व साहित्य एकत्र करावे. लहान लहान 'टिक्की' बनवून तळाव्या. पुदिन्याच्या चटणीबरोबर द्याव्या.

## वास्तू

### घरात भांडणे होत असतील उपाय

* जर एखाद्या घरात वास्तुदोषांमुळे वारंवार भांडणे होत असतील तर अशा घरात खास करून आजारी माणसाच्या खोलीत त्याच्या बिछान्याजवळ थोडेसे मीठ पाण्यात मिसळून काचेच्या बाऊलमध्ये ठेवावे लाभ होतो.

* काही कारणाने एखाद्या खोलीत नैसर्गिक प्रकाश, ऊन, हवा येत नसेल तर अशा खोल्या बेडरूम म्हणून वापरण्याच्या दृष्टीने लाभदायी ठरत नाहीत. अशा खोल्यांमध्ये २-३ जागी चिनी माती, काच व प्लॅस्टिकच्या प्लेटमध्ये थोडे खडे मीठ ठेवा. यामुळे हा दोष कमी होतो.

* तिजोरीचे तोंड कोणत्याही दरवाजाच्या बरोबर समोर येणार नाही याची दक्षता घ्या.

## सौंदर्य

* दह्यात एक चमचा साखर घालून केसांना चोळल्यास कोंडा मुळापासून नष्ट होतो.

* स्नान करताना केसात थोडेसे व्हिनेगर टाका व त्वरित धुवा. यामुळे केसांना चमक येईल आणि केसांचा रंग जास्त गडद होईल.

## सल्ला

आपण दूरच्या प्रवासाला किंवा पिकनिकला जाताना सोबत लोणी नेऊ इच्छित असाल तर ते वितळू नये यासाठी एका छोट्या फ्लास्कमध्ये बर्फाच्या तुकड्यांसोबत लोण्याचा पॅक केलेल्या छोट्या वड्या टाकाव्यात. लोणी सुरक्षित राहील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

## दैनिक पंचांग

शनिवार, दि. २७ एप्रिल २०२४

संकष्ट चतुर्थी, शके १९४६ क्रोधीनाम संवत्सर, चैत्र कृष्णपक्ष, ज्येष्ठा २८।२८

सूर्योदय ०६ वा. २५ मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.

**राशिभविष्य-**

**मेष** : प्रवासासाठी दिवस उत्तम आहे व वरिष्ठांशी संपर्क आपल्यासाठी आनंद देणारा. मनोरंजनासाठी वायफळ खर्च करु नये.

**वृषभ** : व्यस्त रहाल. मनोरंजनासाठी काही प्लॅन कराल. राजकारणी लोकांना पाठिंबा मिळेल. मन उल्हासित होईल.

**मिथुन** : काळ अनुकूल आहे कामे सहज होतील. काही प्रश्नांची सोडवणूक सर्वांना एकत्र आणून करावी लागेल. शत्रूंपासून दूर राहा.

**कर्क** : वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील. कामाचा भार अधिक राहील. जोखमीची कामे टाळा. महत्वाचे काम टाळा.

**सिंह** : कौटुंबिक सभासदांशी वादविवाद टाळा. एखाद्याच्या सहयोगाने कार्ये पूर्ण होतील. जोडीदाराबरोबर घालवलेली वेळ सुखद राहील.

**कन्या** : देवाण-घेवाण टाळा. आपणास जास्त खर्च करावा लागू शकतो. इतरांना सहकार्य केल्याने वाद उद्भवू शकतात. आनंदाची बातमी मिळेल.

**तूळ** : एखादे नवे नाते आपल्यावर प्रभाव पाडेल. प्रवासाचे योग संभवतात. संस्था, संघटनेत महत्वाचे काम मिळू शकते. मतभेदांपासून लांब रहा.

**वृश्चिक** : प्रवासाचे योग संभवतात. संस्था, संघटनेत महत्वाचे काम मिळू शकते. आरोग्य उत्तम राहील. कसूर नको. जोडीदारा बरोबर तणाव ठेऊ नका. मित्रांकडून आर्थिक लाभ होईल.

**धनु** : नवीन योजनांमध्ये यश मिळेल. आरोग्याची व खाण्या-पिण्याची काळजी घ्या. आर्थिक नुकसानाची शक्यता आहे. आनंदाची बातमी मिळेल.

**मकर** : लांबचे प्रवास टाळा. अपेक्षेनुसार कार्ये होतील. कामाच्या ठिकाणी प्रसन्न वातावरण राहील. कार्यक्षेत्राचा विकास आणि विस्तार होईल.

**कुंभ** : मित्रांकडून आर्थिक लाभ होईल. आरोग्याची व खाण्या-पिण्याची काळजी घ्या. अधिकारांचा योग्य उपयोग करून घ्याल.

**मीन** : मनावरील दडपण दूर. अनुसंधानातून कार्यक्षेत्रात प्राप्ति योग. धर्म, आध्यात्मात रूचि वाढेल. वैवाहिक जीवनात सुख मिळेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

## शब्दगंध क्र. ६९११

सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ■ | ४ | | ५ | ६ |
| ■ | ७ | | | | ■ | ८ | |
| ९ | | | ■ | १० | ११ | | ■ |
| १२ | | ■ | १३ | | | ■ | १४ |
| | ■ | १५ | | ■ | ■ | १६ | |
| १७ | १८ | | ■ | १९ | | | |
| २० | | ■ | २१ | | ■ | | ■ |
| ■ | २२ | | | | ■ | २३ | |

**आडवे शब्द :-** १) हे प्यायल्याने मृत्यू येत नाही असे म्हटले जाते ४) अतिशय प्रयत्न; गर्दी; पंचाईत; अडचण ७) सप्त पातालांपैकी एक ८) गेय काव्य; गाणे; गान ९) निरोप: मेसेज १०) अतिशय गरीब; खंक १२) समेट; सलोखा; एक वेद १३) हरभऱ्याच्या डाळीचे पीठ १५) आजच्या आदला दिवस १६) तापलेल्या दुधावर येणारा पापुद्रा १७) लहान; छोटा (भाऊ वगैरे) १९) पंच; पंचांमार्फत चौकशी; निवाडा करणारे मंडळ २०) परवानगीने काढलेली सुट्टी २१) तपास; शोध; ठावठिकाणा २२) चूक; हलगर्जीपणा; अपराध २३) वेल; वल्लरी

**उभे शब्द :-** २) निर्जीव शरीर; मुडदा; प्रेत ३) दिवंगत अभिनेता राजेंद्रकुमारचा जुन्या काळातील एक हिंदी चित्रपट ४) गायनातील एक राग ५) मागे झालेले ६) रममाण; मग्न; लीन ९) न तुटता अखंड पडणारी धार ११) गेय काव्य; गीत १३) शंकराला याची पाने वाहतात १४) जनता; प्रजा' १५) काही वनस्पतींना अणकुचीदार अवयव येतो तो १६) एक दुचाकी वाहन १८) भांडखोर (स्त्री) १९) भोजनास बसलेल्या अनेक लोकांची रांग २१) सामान

### शब्दगंध क्र. ६९१० चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | मा | प | ■ | उ | पा | स | ना |
| ज | व | ळ | ■ | मा | न | ■ | ट |
| ग | ळ | स | र | ■ | दा | ट | ■ |
| र | ती | ■ | क्षा | ल | न | ■ | त |
| ■ | ■ | वि | ■ | सू | ■ | चो | र |
| ■ | ■ | सं | ग | ण | क | ■ | का |
| म | न | ग | ट | ■ | शि | का | री |
| म | द | त | ■ | मै | दा | न | ■ |

### फिल्मीचक्कर क्र. ११३५ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ह | र | दि | ल | जो | प्या | र | ■ |
| म | ■ | ल | ■ | जी | ■ | जा | ग |
| तो | ■ | ते | ■ | ता | ल | ■ | द |
| ते | ■ | रा | जी | व | ■ | प्या | र |
| रे | ■ | दी | ■ | ही | ना | ■ | ■ |
| आ | ■ | वा | सू | ■ | ना | रा | ज |
| शि | ■ | ना | ■ | ■ | ■ | ■ | यं |
| क | र्मा | ■ | वि | श्वा | स | घा | त |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : तुम्ही जितके चांगुलपणाने वागाल; तितका अधिक चांगुलपणा तुम्हाला प्राप्त होईल.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### मृत्यूनंतर मृतदेह कडक का होतो?

माणूस मेल्यानंतर सुरुवातीला त्याचे स्नायू शिथिल होतात व शरीर सैल पडते. ही अवस्था तीन ते चार तास राहते. त्यानंतर मात्र शरीरात काही बदल घडून येतात. स्नायूंतील बदलांमुळे मृतदेह कडक होतो.

स्नायूंमध्ये मायोसीन आणि ॲक्टीन नावाचे तंतू असतात. त्यांच्या आकुंचन-प्रसरणामुळेच स्नायूंचे आकुंचन-प्रसरण होत असते. आकुंचन पावल्यानंतर स्नायू कडक होतात तर प्रसरणामुळे शिथिल होतात. मृत्यूनंतर शरीरात, स्नायूंमध्ये ऊर्जेची निर्मिती होऊ शकत नाही. त्यामुळे मायोसीन व ॲक्टीन हे तंतू एक-दुसऱ्यात मिसळून त्यांचे निर्जलीकरण होऊन एक कडक पदार्थ तयार होतो. साहजिकच या तंतूचे आकुंचन-प्रसरण थांबते व स्नायू व पर्यायाने मृतदेह कडक होतो. या प्रक्रियेला इंग्रजीत रायगर मॉर्टीस असे म्हणतात.

भारतात मृतदेह कडक होण्याची प्रक्रिया मरणानंतर २ ते ३ तासांनी सुरू होते. ही प्रक्रिया पूर्ण व्हायला सुमारे १२ तास लागतात. त्यानंतर १२ तासांत शरीर परत शिथिल होते. मायोसीन व ॲक्टीनचे विघटन झाल्यामुळे स्नायूंचा कडकपणा जातो. रायगर मॉर्टीसमुळे मृत्यूच्या वेळेसंबंधी अंदाज बांधता येतो. दुसरे म्हणजे, मरणाच्या वेळी व्यक्तीची काय अवस्था होती, हेही कळू शकते. असे हे रायगर मॉर्टीस म्हणजेच मृतदेहांचे कडक होणे. गुन्ह्याचा शोध घेण्यासाठी याद्वारे जणू मृतदेहही मदत करतो!

## चोराचा लाभ

चोरीचा माल गाठोड्यात बांधून एक चोर रस्त्याने चालला असता त्याला एका विहिरीजवळ एक मुलगा रडत बसलेला दिसला. त्याच्याजवळ जात चोर म्हणाला, ''का रे रडतोस बाळा?'' त्यावर मुलगा म्हणाला, ''काय सांगू दादा? माझी चांदीची घागर पाणी वर काढीत असताना दोर तुटून विहिरीत पडली. आता घरी काय सांगू? वडील तर मला झोडपून काढतील.''

यावर चोर म्हणाला, ''मी देतो काढून तुझी घागर; पण त्याबद्दल तू मला काय देणार?'' यावर त्या मुलाने त्याच्याजवळ असलेली तांब्याची घागर त्याला देऊ केली. मग काय? असे म्हणत चोराने आपले गाठोडे आणि अंगावरील कपडे मुलाजवळ ठेवले आणि तो विहिरीत उतरून पाण्यात बुड्या मारू लागला. बराच वेळ प्रयत्न करूनही घागर काही त्याच्या हाती लागेना. तेव्हा वैतागून तो वर आला. पहातो तो काय त्या लबाड आणि लुच्च्या मुलाने त्याचे गाठोडे, कपडे घेऊन तेथून केव्हाच पलायन केले होते.

तात्पर्य : अति लोभाने पदरी निराशा येते.

## जीवन चक्र



आपके बिना हमारा ख्याल करने वाला और कौन है ? जब तक हमारा पूरा विश्वास परमात्मा में नहीं होता, तब तक हम उसकी ओर कदम नहीं उठा सकते। वह बहुत दयालु है, कृपालु है। जिस ८४ लाख जियाजून के चक्कर में हम पड़े हुए हैं, उससे निकलने का तरीका उसने हमें सिखाया है। कैसे? सबसे पहले तो हमें मानव चोला दिया, यह शरीर दिया, जिसे 'Roof Crown of all Creation' कहा जाता है क्योंकि इसी चोले में हम अपने आपको जान सकते हैं और परमात्मा को पा सकते हैं। दुसरी देन हमें यह दी है कि इस शरीर में होते हुए हमें किसी महापुरुष, किसी सत्पुरुष, किसी सत्गुरु की शरण में भेज दिया, और उस महापुरुष ने हमारा ध्यन प्रभु की ओर कर दिया । हमें प्रभु के नाम, प्रभु के शब्द के साथ जोड़ दिया, वह शब्द जो प्रभु से उत्पन्न हुआ है, वह शब्द जो कण-कण में बसा हुआ है, वह शब्द जिसके ज़रिये सभी मंडल बने हैं, वह शब्द जिसके ज़रिये हमारी आत्मा इस धरती पर आई है। लेकिन वह शब्द हमारे अंतर में होते हुए भी हम अपने आप उसे सुन नहीं सकते, उसके साथ जुड़ नहीं सकते। यहाँ गुरु अर्जनदेव जी महाराज यही समझा रहे हैं और इसी भाव को बहुत से महापुरुषों ने व्यक्त किया है। संत दर्शनसिंह जी महाराज ने अपने एक शेर में फ़रमाया है :

**एक 'दर्शन' ही मिला औरों का गमख्वार हमें**
**अपने गम में तो ज़माने को परेशां देखा**

- मताओ नूर, ग़ज़ल-३८

हर एक इंसान अपने गम में तो परेशान रहता है, मगर दूसरों की मदद करने के लिए आगे कदम नहीं बढ़ाता। सिर्फ एक महापुरुष हम सब का मददगार होता है और महापुरुष वह है जो परमात्मा से एकमेक है और उसके हुक्म से ही इस धरती पर आया है। उसके हुक्म से ही वह जीवों को प्रभु के शब्द के साथ जोड़ने का कार्य करता है। आगे गुरु अर्जनदेव जी महाराज फरमा रहे हैं :

**जलि थलि महीअलि रहिआ भरपूरि ।**
**निकट वसै नाही प्रभु दूरि ।।**

जो जल है, पृथ्वी है, आकाश है, पाताल है, सब के कण कण में प्रभु आप समाये हुए हैं, वह आप से भरपूर है। प्रभु और उसका शब्द allpervading है, all-sustaining है, all-controlling है सभी जगह वह है और उसके हुक्म से ही सब कुछ चल रहा है। वह हमारे बहुत करीब है। परमात्मा को आत्मा की आत्मा भी कहा गया है और हममें और आप में कोई दूरी नहीं है। कुरान शरीफ़ में आया है कि खुदा शाहरग के बहुत क़रीब है, जिसे सुष्मना नाड़ी कहा गया है। सुरत-शब्द योग का रास्ता बीच का रास्ता है। सुष्मना के ज़रिये हमारी आत्मा अंतर के मंडलों में उड़ान करती है। संत दर्शनसिंह जी महाराज ने इसी भाव को अपने एक शेर में फ़रमाया है :

**मिलेगा, रूह को पर्वाज दे के देख जरा**
**करीब है, उसे आवाज़ दे के देख ज़रा**

इसी भाव को बहुत से महापुरुषों ने हमें बताया है कि परमात्मा हम से अलग नहीं, परमात्मा हम से दूर नहीं, सिर्फ उसकी ओर ध्यान देना है। वह हम सब के बीच में है। हमारे अपने आप से भी वह बहुत नज़दीक है। यदि हम अपना ध्यान उस ओर नहीं करेंगे तो फिर हम उसे कैसे जानेंगे, कैसे पहिचानेंगे, कैसे उसमें लीन होंगे? गुरु अर्जनदेव जी महाराज भी हमें यही समझा रहे हैं कि परमात्मा को हमें बाहर जाकर ढूँढ़ने की कोई ज़रूरत नहीं है। अगर वह बाहर होता, आसमान में होता, तो उसे पाने का कोई जरिया बना होता, लेकिन प्रभु हमारे अंतर में है, हमें अंतर्मुख होना है।

**(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

## शुद्ध जीवन जीने के मंत्र

किसान भाई बहनों, चाहते हो सुख-शान्ति तो अपनाओ सेंन्द्रिय खेती सेन्द्रियता में ही रहती है जीवाणुओं की बस्ती दोनों मिलकर ही मिट्टी को जिन्दा बनाती यहाँ ही योग लगाकर भरना है शक्ति तब ही होगी सात्विक और पौष्टिक अनाज की निर्मिती खुद भी खाओ औरों को भी खिलाओ, यही बनाओ नीति चिंता छोडो, आगे बढो, भगवान

ग्राम विकास प्रभाग द्वारा समय-प्रति-समय गाँव-गाँव में जाकर स्वच्छता, साक्षरता, व्यसनमुक्ति, अधश्रद्धा निर्मूलन विषय पर लोगों में जागरूकता लाने का प्रयास होता आया है। आज किसानों के जीवन में तथा समाज के हर क्षेत्र में नई-नई समस्यायें बढ़ रही हैं परन्तु हर समस्या कुछ-न-कुछ सिखाकर ही जाती है इसलिए हमें उमंग-उत्साह में रहकर हर समस्या के पीछे क्या कारण है और उसका निवारण कैसे करें, इस पर जागृत रहना आवश्यक है। वर्तमान खेती करने में सबसे ज्यादा समस्याएँ प्रकृति के द्वारा ही निर्माण हो रही हैं और किसान आनेवाली परिस्थितियों में स्वयं की स्थिति को सुरक्षित रखने में कमजोर महसूस कर रहा है।

उसकी मानसिक शक्ति बहुत ही कम हो गई है। परिस्थिति माना दूसरों के द्वारा आनेवाली स्थिति। वह जैसे आती है वैसे ही चली भी जाती है परन्तु हमें अपना मानसिक संतुलन नहीं बिगाड़ना है क्योंकि ईश्वर ने हमको यह बताया है कि स्वयं की अच्छी स्थिति ही परिस्थिति से निपट सकती है और स्वयं की स्थिति अच्छी बनाने के लिये हमें रोज़ कुछ समय योग अभ्यास करना बहुत आवश्यक है। योग अभ्यास द्वारा मिलनेवाली शक्ति से हम अपने मनोविकारों को नियंत्रित कर सकते हैं क्योंकि हर समस्या का मूल कारण कोई न कोई मनोविकार ही तो है। क्रोध, ईर्ष्या, घृणा, लोभ, मोह ये सब मनोविकार हैं जिनके कारण परिस्थितियाँ निर्माण हो रही हैं। प्रकृति को भी हमने दुःख दिया है इसलिए प्रकृति भी हमसे नाराज़ हो गई है। अब हमें प्रकृति को भी राज़ी करना है तो योग अभ्यास द्वारा पहले स्वयं में परिवर्तन करना जरुरी है। खेती में फसल की रक्षा करने के लिए भी पहले प्रकृति की रक्षा करना आवश्यक है तब प्रकृति खुद फसल की रक्षा करेगी इसलिए हमारा सुधरना जरूरी है।

आज खेती में उपज की तुलना में खर्चा बहुत हो रहा है और अगर खर्चा कम करना है तो प्रकृति के नियम अनुसार खेती में प्राकृतिक संसाधनों का उपयोग करना आवश्यक है। वर्तमान समय इस विधि को अमल में लाना थोड़ा मुश्किल लगता होगा परन्तु ध्यान के अभ्यास से हम अपने मनोबल को बढ़ायेंगे तो ये सब बातें सहज लगेंगी। हम शान्ति से, प्रेम से, बड़े उमंग-उत्साह से प्राकृतिक संसाधनों का उपयोग करके खेती करते हैं तो प्राप्त होनेवाला अनाज भी सात्विक और पौष्टिक ही मिलेगा जिसकी वर्तमान में सबको बहुत ही आवश्यकता है। आप सभी परिचित हैं कि कैसे केमिकल्स के अधिक इस्तेमाल से प्रकृति का संतुलन बिगड़ रहा है और शरीर की बीमारियाँ भी बढ़ रही हैं। आज किसान अपनी मत से, अपनी-अपनी समस्या का हल खुद ढूँढ़ रहा है, साथ ही साथ दूसरों को दोषी समझने लगा है। ऐसे में आवश्यकता है किसानों के संगठित होने की और संगठन के लिये आवश्यकता है सत्यता, ईमानदारी, विश्वास, धैर्य आदि मूल्यों की, जो आध्यात्मिकता से ही प्राप्त होते है ।


**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

पत्नीला त्रासून पती घराबाहेर पडताच...
पत्नी : कुठे जात आहात?
पती : मरायला चाललोय...सुसाईड करीन...
पत्नी : कुठेही जा, पण स्वेटर घालून जा, बाहेर खूप थंडी आहे, आजारी पडल्यावर तुमची खैर नाही.

## रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्रजीत)



तू जेथे पाहुणा म्हणून जाणारेस
ते एक भव्य सभागृह आहे
म्हणून तुला लिहिलेले पत्र हे
ंतराळाकडून अंतराळाकडे धाडलं जातयं.

**मूळ इंग्रजी कविता - रविंद्रनाथ टागोर**
**मराठी अनुवाद - अरविंद ब्राम्हणे,**
भिंगार मो. ९४०३७३४२८१

## स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

अहो! डॉक्टर, हिला जरा समजावून सांगा. हिच्या बापाला जर हिचे थेर कळले तर तो मला आणि हिला जिवंत सोडणार नाही. हिने कुठे तोंड दाखवायला जागा ठेवली नाही. ओ.पी.डी.मध्ये आल्या-आल्या कौशल्याबाई तळतळ व्यक्त करत होत्या. मी त्यांना विचारले, काय झाले कौशल्याबाई? लेकीवर एवढं का रागावला आहात? तेव्हा त्या सीमाकडे हात करून म्हणाल्या, तिलाच विचारा काय झाल ते!', सीमा खाली मान घालून आईला घाबरून शांतपणे बसली होती. कौशल्याबाई सीमाची सावत्र आई होती. वसंतरावांच्या पहिल्या पत्नीची ती मुलगी होती. त्यांच्या पहिल्या पत्नीचे सीमा बारा वर्षांची असताना निधन झाले. त्यानंतर एक वर्षानं वसंतरावांनी दुसरे लग्न केले. ते ड्राइव्हर होते. त्यामुळे मुलीकडे लक्ष राहावे, तिला आई मिळावी व आपलाही संसार पुढे वाढावा याकरिता त्यांनी कौशल्याबाईंशी दुसरा विवाह केला. कौशल्याबाईला एक मुलगा व एक मुलगी अशी दोन अपत्ये झाली. सीमाचे बालपण व तारुण्यावस्थेचा काळ त्यांचा सांभाळ करण्यात जात होता. नवीन आई तरुण होती; ती सीमाशी आईसारीख वागली नाही. तिची शाळा बंद केली. घरातील धुणी-भांडी, स्वयंपाक, लहान भावंडांचे संगोपन यातच तिचा वेळ जाऊ लागला. वसंतराव कामानिमित्त १०-१५ दिवस घरी नसत. त्यातच कौशल्याबाई व त्यांच्या वयात अंतर असल्यामुळे तिची मर्जी सांभाळावी लागत असे.

सीमा काहीच बोलत नव्हती. शेवटी कौशल्याबाई सांगायला लागल्या, मॅडम, माझा लहान भाऊ माझ्याकडं कॉलेजच्या शिक्षणासाठी आला आहे. काल मी शेजारी गप्पा मारायला गेले होते. घरी आल्यानंतर बघते तर काय? माझा भाऊ म्हणजेच हिचा मामा व ही एकमेकांच्या मिठीमध्ये होते. माझा या घटनेवर विश्वासच बसत नव्हता. हिला नंतर विचारले असता 'माझे व त्याचे प्रेमसंबंध आहेत व आम्ही लग्न करणार आहोत' असे म्हणाली. हे माझ्या नातेवाइकांमध्ये कळाले तर आमची किती मानहानी होईल? माझ्या भावाचं शिक्षण चालू आहे. त्याचं भवितव्य कोलमडेल. शिवाय यांचं नातं लग्न करण्यासाठी योग्य नाही. कौशल्याबाईंचे ऐकल्यावर मी विचारले, तुम्ही तुमच्या लहान भावाशी चर्चा केली का? त्याचं काय म्हणणं आहे? त्याला पण मी खूप बोलले तर तो म्हणाला, (क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# सामाजिक विकासासाठी विविधतेचा आदर करून कृती कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याची गरजेचे

## पनामा येथे पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत डॉ. सुरेश पठारे यांनी मांडली भूमिका

नगर - जागतिक असमतोल निर्मूलन आणि सामाजिक न्याय वाढवण्याच्या उद्देशाने सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रभावी कार्यक्रम राबविण्याची नितांत गरज आहे. सामाजिक विकास साध्य करण्यासाठी विविधेचा सन्मान व आदर करून समाजातील व्यापक स्वरुपात असलेली असमानता दूर करण्यासाठी एकत्रित प्रयत्नांची गरज असल्याचे मत डॉ. सुरेश पठारे यांनी व्यक्त केले. डॉ. पठारे यांनी समुदायाच्या विकासासाठी सामूहिक कृतीचा वारसा अधोरेखित केले. विविधता आणि एकता कमी करणाऱ्या विचारसरणीच्या अतिक्रमणाचा प्रतिकार करण्याची भूमिका यावर जोर दिला.



पनामा येथे पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदप्रसंगी डॉ. सुरेश पठारे व उपस्थित सामाजिक कार्यकर्ते.

येथील बीपीएचई सोसायटीचे सीएसआरडी सामाजकार्य व संशोधन संस्थेचे संचालक डॉ. सुरेश पठारे यांना पनामा येथे पार पडलेल्या समाजकार्य व सामाजिक विकास या विषयावर आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी होवून भूमिका मांडण्याची संधी मिळाली. ५६ देशातील दीड हजाराहून अधिक सहभागी झालेल्या प्रतिनिधीमध्ये इंटरनॅशनल कौन्सिल फॉर सोशल वेलफेअर या संस्थेमधून दक्षिण आशिया खंडातून प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान डॉ. पठारे यांना मिळाला. एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पार पडलेल्या या परिषदेत जगभरातील समाजकार्य क्षेत्रातील तज्ञ, अभ्यासक, संशोधक आणि धोरणकर्त्यांना समाजकार्य आणि सामाजिक विकास या विषयांवर विचारमंथन करण्यासाठी तसेच ज्ञानाची देवाणघेवाण करण्यासाठी, आणि जगभरातील गंभीर सामाजिक आव्हानांना तोंड देण्यासाठी धोरणे विकसित करण्यासाठी प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करून दिले गेले. सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि जागतिक स्तरावर महत्वपूर्ण प्रश्नांवर धोरणात्मक निर्णयांवर प्रभाव टाकण्यासाठी या परिषदेमध्ये सखोल विचारमंथन करण्यात आले. अनेक संशोधकांनी आपले संशोधन लेख या ठिकाणी सादर केले. बदलत्या सामाजिक परिस्थितीला अनुसरून सामाजिक प्रश्न हाताळण्यासाठी समाजकार्य पद्धती अधिक व्यापक करणे गरजेचे असल्याचे अनेकांनी मत प्रदर्शित केले. जागतिक स्तरावरील संकटे व आव्हानाचा सामना करण्यासाठी समाजातील नागरी समूहाचा व स्वयंसेवी संस्थांच्या सहभाग वाढविणे आवश्यक असल्याचा सूर या परिषेदेतील प्रतिनिधींचा होता.

यावेळी जगभरातील वंचित समाजाला भेडसावणाऱ्या बहुआयामी आव्हानांना तोंड देण्यासाठी या परिषेदेत सहभागी झालेले विविध देशांचे प्रतिनिधी नाविन्यपूर्ण धोरणे आणि दृष्टिकोन शोधण्यासाठी प्रयत्न करतील तसेच या परिषदेद्वारे मूर्त स्वरूपातील सर्वसमावेशकता आणि विविधतेचा आदर ही परिवर्तनात्मक बदलासाठी उत्प्रेरक म्हणून काम करेल, समुदायांना अधिक न्याय्य आणि शाश्वत भविष्याच्या दिशेने प्रवास सुरू करण्यासाठी सक्षम करेल असा आशावाद डॉ. सुरेश पठारे यांनी व्यक्त केला.

डॉ. सुरेश पठारे यांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेतील सहभागबद्दल समाजातील विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन होत असून अशा आंतरराष्ट्रीय स्तरावरील त्यांचा सहभाग भारतातील समाजकार्य शिक्षण क्षेत्रासाठी अभिमानास्पद असून भारतातील सामाजिक असमानता दूर करण्यासाठी तसेच सर्वसमावेशक विकासाला चालना देणारी धोरणे आणि उपक्रमांना आकार देण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देईल असा विश्वास समाजकार्य क्षेत्रातील अनेकांनी व्यक्त केला. संस्थेचे प्राध्यापक कर्मचारी व विद्यार्थ्यांनी यावेळी त्यांचे अभिनंदन करत सीएसआरडी संस्थेसाठी हि गौरवाची बाब असल्याच्या भावना व्यक्त केल्या.



## जैन वत्सल्य संस्थेच्या वतीने शिधा वाटप

जैन वत्सल्य संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष अजित सिमरतमल बोरा यांच्या हस्ते व संस्थेचे उपाध्यक्ष सुभाष झुंबरलाल मुथा, विजय गुगळे, ईश्वर बोरा, विजय गुंदेचा, महेश गुगळे यांच्या उपस्थितीत अशोक कोठारींच्या निवासस्थानी शिधा वाटप करण्यात आले.

## फ्री करिअर कौन्सिलिंग-दहावी नंतर काय?

नगर - दहावीची परीक्षा दिलेल्या बहुसंख्या विद्यार्थ्यांना भविष्यात यशस्वी होण्यासाठी कोणते क्षेत्र निवडावे हा प्रश्न भेडसावत आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांचे इयत्ता अकरावी मध्ये कोणत्या शाखेत प्रवेश घ्यायचा हे ठरलेले आहे त्यांना देखील त्या शाखेतील विविध संधींची परिपूर्ण माहिती नाहीय. बऱ्याच शाळा किंवा सामाजिक संस्था याविषयी व्याख्याने आयोजित करतात व त्यातून उत्तम माहिती सांगितलीही जाते. दहावीनंतर तुम्ही कोणती साईड निवडता व कुठे शिकता यावर बरेच अवलंबून असते. या संदर्भातील तज्ञांच्या प्रत्यक्ष भेटीत विद्यार्थी व पालकांचे संपूर्ण शंका निरसन झाल्यास यशस्वीततेच्या दृष्टीने कुठे अ‍ॅडमिशन घ्यायची हे ठरवणे सोपे जाईल.

श्रीरामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनचे मानधना जुनिअर कॉलेज व सी.ए. पवनकुमार दरक यांची एफसीए अ‍ॅकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमानातून विद्यार्थ्यांना याबाबतचे वैयक्तिक मार्गदर्शन मिळण्याची संधी उपलब्ध करून देत आहोत. ज्ञान संस्कृती वर्धकम या आपल्या ब्रीदवाक्य प्रमाणे श्रीरामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशन ने आज पर्यंत अनेक विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृती बरोबर ज्ञान देऊन घडवले आहे. सीए पवनकुमार दरक हे स्वतः पहिल्याच प्रयत्नात उत्तम गुणांनी सीए झालेले आहेत. २००८ पासून त्यांच्या अ‍ॅकॅडमीच्या अंतर्गत अनेक विद्यार्थी सी.ए., सी. एस. झाले आहेत.

सी.ए. पवनकुमार दरक यांचा वाणिज्य क्षेत्रातील फायनान्स, मॅनेजमेंट, टॅक्सेशन, इकॉनॉमिक्स इत्यादी विषयांचा अभ्यास व अनुभव दांडगा आहे. याचा फायदा विद्यार्थ्यांना व्हावा या दृष्टीने नगरकरांना ही संधी मिळत आहे.

विद्यार्थी अथवा पालक खाली दिलेल्या नंबरवर कॉल करू शकता किंवा श्रीरामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनच्या मानधना ज्युनिअर कॉलेजमध्ये २९ एप्रिल ते ५ मे दरम्यान सकाळी साडेदहा ते तीनच्या दरम्यान येऊन प्रत्यक्ष भेटीत माहिती मिळवू शकता. विद्यार्थी व पालकांनी याचा लाभ घ्यावा. माहितीसाठी संपदा देशपांडे ९४२३७९२३१५, सीए पवनकुमार दरक ९४२२२२७४६४, सरला काथेड ७५८८३६०१२८

# नगरमध्ये २७ एप्रिलला जनावरांची मोफत तपासणी व उपचार शिबीर

### जागतिक पशुचिकित्सा दिवसाचा उपक्रम, पशुपालकांना लाभ घेण्याचे आवाहन

नगर - जागतिक पशुचिकित्सा दिवसानिमित्त जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय व जायंट्स ग्रुप ऑफ अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.२७ एप्रिल) जनावरांची मोफत तपासणी उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. जुने बस स्थानक जवळील जिल्हा पशु सर्व चिकित्सालय हॉस्पिटलमध्ये होणाऱ्या या शिबिराचा पशु पालकांना लाभ घेण्याचे आवाहन पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. मुकुंद राजळे यांनी केले आहे.

शनिवारी सकाळी १० वाजता शिबिराचे उद्घाटन होणार आहे. या शिबिरामध्ये मोफत श्वानदंश रोग प्रतिबंधक (रेबीज) लसीकरण, धनुर्वात प्रतिबंधक लसीकरण तसेच जंत प्रतिबंधक औषधे देण्यात येणार असल्याची माहिती जायंटस् वेल्फेअर फाउंडेशनचे स्पेशल कमिटी सदस्य संजय गुगळे यांनी दिली.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. शशिकांत कारखेले, डॉ. वर्षा साबळे, डॉ. ज्ञानेश्वर काळे, जायंटस् ग्रुप ऑफ अहमदनगरच्या अध्यक्षा पूजा पातुरकर, विद्या तन्वर, नूतन गुगळे आदी प्रयत्नशील आहेत.

# सामाजिक बांधिलकीच्या उपक्रमाचा आदर्श समाजापुढे ठेवता येईल

### नितीन भोर यांचे प्रतिपादन

नगर - रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे त्यामुळे अनेकांचे प्राण वाचवले जाऊ शकतात. रक्तदानासारख्या सामाजिक उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकीतून समाजापुढे एक वेगळा आदर्श उभा राहतो. असे प्रतिपादन भोरवाडी येथील दर्शन आश्रमचे चेअरमन नितीन भोर यांनी केले. भोरवाडी येथे दर्शन आश्रम आयोजित रक्तदान शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.


भोरवाडी येथे दर्शन आश्रम आयोजित रक्तदान शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित पाहुणे.

यावेळी भोरवाडीचे सरपंच भास्कर भोर, मालेगाव ब्लड सेंटरचे डायरेक्टर कैलास सोनवणे, बाबासाहेब भोर, रंगनाथ जासूद, संतोष गायके आदी उपस्थित होते.

दरवर्षी या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. शिबिराचे हे दुसरे वर्ष सकाळी आठ वाजता दीपप्रज्वलनाने रक्तदान शिबिराला सुरुवात करण्यात आली. मालेगाव ब्लड बँकेच्या डॉक्टरांच्या टीमने दिवसभरामध्ये १२४ रक्त पिशव्यांचे संकलन केले. या शिबिराला भोरवाडी ग्रामस्थांसह पंचक्रोशीतून प्रतिसाद मिळाला. या रक्तदान शिबिरात १२४ रक्त पिशवी संकलित झाल्या आहेत.

मालेगाव ब्लड सेंटरचे आरोग्य अधिकारी डॉ. दिलीप भावसार, निवृत्ती सोनवणे, आकाश कुमावत, मनोज वडनेरे, अजय पवार यांच्यावतीने या शिबिरात रक्त संकलनाचे काम करण्यात आले. यावेळी प्रतीक भोर, प्रवीण जासूद, चंद्रकला भोर आदी उपस्थित होते.

प्रस्ताविक राजेंद्र भोर यांनी केली तर आभार प्रदर्शन विशाल जासूद व अरुण भोर यांनी केले





नगर जिल्हा टेनिस क्रिकेट स्पर्धेचे पारितोषिक वितरण करताना राहुरी कृषी विद्यापीठाचे क्रिडा अधिकारी डॉ. विलास आवारी. समवेत प्राचार्य अरूण तुपविहीरे, मुख्याध्यापक बाळासाहेब खेत्री, बाळासाहेब डोंगरे, बाबा सर, जितेंद्र मेटकर, मीनाक्षी गिरी आदी. दुसऱ्या छायाचित्रात लखनऊ येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेले महिला व पुरुष स्पर्धक.

# राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेत अहमदनगर जिल्ह्याचा मुलींचा संघ विजयी

### लखनऊ येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी संघाची निवड

नगर - सातव्या वरिष्ठ राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेत अहमदनगर जिल्ह्यातील मुलींचा संघ विजेता ठरला. टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र व अहमदनगर जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने राहुरी कृषी विद्यापीठ येथील सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाच्या मैदानात चार दिवस ही स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेमध्ये दहा जिल्ह्यातील पुरुष खेळाडूंनी तर सहा जिल्ह्यातील महिला खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता.

अतिशय चुरशीचे सामने या स्पर्धेत रंगले होते. स्पर्धेचे पारितोषिक वितरण राहुरी कृषी विद्यापीठाचे क्रीडा अधिकारी डॉ. विलास आवारी, माध्यमिक विभागाचे प्राचार्य अरुण तुपविहिरे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक बाळासाहेब खेत्री, उपमुख्याध्यापक बाळासाहेब डोंगरे, पर्यवेक्षक बावा सर, प्राध्यापक जितेंद्र मेटकर, टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या सचिव मीनाक्षी गिरी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये झाले.

महिलांच्या अंतिम सामन्यात अहमदनगरच्या राहुरी येथील सावित्रीबाई फुले विद्यालयाच्या संघाने धाराशिव क्रिकेट संघाचा पराभव करत सर्वोत्कृष्ट कामगिरी करून विजेता ठरला. तर मुलांमध्ये अहमदनगर जिल्ह्याच्या संघाने तृतीय क्रमांकाचे विजेतेपद मिळवले.

विजय संघाची लखनऊ येथे पुढील महिन्यात होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. स्वामिनी जेजुरकर स्पर्धेतील सर्वोत्तम महिला खेळाडू ठरली. अहमदनगर जिल्ह्याच्या संघात अक्षदा बेल्हेकर (कर्णधार), स्वामिनी जेजुरकर, वृषाली पारधी, ऐश्वर्या चौरसिया, संतोषी भिसे, मृणाल ननवरे, श्रेया सोनवणे, सिमरन शेख, धनश्री शेडगे, नशरा सय्यद राशी पवार, प्रणाली पानसंबळ, लक्ष्मीप्रिया म्हसे, अमृता ढगे, वैष्णवी जावळे आदींचा समावेश होता. विजेत्या खेळाडूंना संघाचे प्रशिक्षक तथा क्रीडाशिक्षक घन:श्याम सानप यांचे मार्गदर्शन लाभले.

विजेत्या संघाचे राहुरी कृषी विद्यापीठाचे कुलगुरू तथा सावित्रीबाई फुले शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. पी.जी. पाटील, शिक्षण मंडळाचे सचिव डॉ.महानंद माने, खजिनदार महेश घाडगे, कल्याण अधिकारी डॉ. महावीर सिंग चौहान, क्रीडा अधिकारी डॉ. विलास आवारी, प्राचार्य अरुण तुपविहिरे, प्राथमिकचे मुख्याध्यापक बाळासाहेब खेत्री, उपमुख्याध्यापक बाळासाहेब डोंगरे, पर्यवेक्षक मनोज बावा, एनसीसी प्रमुख संतोष जाधव यांनी अभिनंदन करुन पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# 'आर्ट असोसिएट्स'तर्फे नाशिकमध्ये २७ एप्रिलला शास्त्रीय नृत्यातील विश्वविक्रम

### अहमदनगरमधील कलाकारांचे सादरीकरण

नाशिक - आर्ट असोसिएट्स हे तीन मैत्रिणींच्या संकल्पनेतून पुढे आलेले व्यासपीठ आहे. या व्यासपीठातर्फे २७ एप्रिल रोजी शंकराचार्य न्यास येथे विश्वविक्रमासाठी शास्त्रीय नृत्यातील विविध नृत्य तालांचा (रिले फॉरमॅट) आविष्कार सादर केला जाणार आहे.




अमी छेडा, राधिका चावरे आणि तोरल टकले या तीन नृत्यांगनांचे नृत्यावर असलेले प्रेम आणि वर्षभर विविध भारतीय सणांना नृत्यनाट्य रुपात गुंफताना त्याचे स्वरूप कसे असू शकते, या एका संकल्पनेतून आर्ट असोसिएट्सची निर्मिती झाली. त्यानुसार २७ एप्रिल रोजी या कार्यक्रमाद्वारे शास्त्रीय नृत्यातील विविध प्रकारातून पौराणिक व ऐतिहासिक कथा नृत्याद्वारे महाराष्ट्रातील नृत्यांगना, कलाकार हे विश्वविक्रमासाठी एका पाठोपाठ एक, न थांबता नृत्याविष्कार सादर करणार आहेत. हा आगळावेगळा कार्यक्रम म्हणजे एक नृत्यपर्वणीच असेल. असा या तिघींना विश्वास वाटतो. यासाठी अहमदनगर येथून कथक नृत्य कलाकार व आर्मी शाळेतील एकूण ५० विद्यार्थी सहभागी होणार आहेत. यात सलग ४८ मिनिटे विविध पौराणिक कथांवरील कथक नृत्य सादरीकरण हे कलाकार करणार आहेत. याची रंगीत तालीम नगर येथे नुकतीच घेण्यात आली. यासाठी सुफी गायक पवन नाईक व तबला वादक मंदार सुवर्णपत्की यांची उपस्थिती लाभली. नृत्य व पौराणिक कथांचा मेळ सर्व नृत्यांगनांनी साधला आहे, अशी कौतुकाची थाप दोन्ही पाहुण्यांनी यावेळी कलाकारांना दिली. आपल्या कलेची साधना तसेच नवनवे प्रयोग तुम्हाला चांगले नृत्य कलाकार बनण्यासाठी आवश्यक आहे व ते निरंतर ठेवा, असा कानमंत्रही त्यांनी दिला.

या कार्यक्रमातून एकूण १५० पेक्षा अधिक कलाकार, सलग ७ तासांहून अधिक नृत्य सादर करणार आहेत. अशा अनोख्या कार्यक्रमात नृत्य सादर करण्याची संधी नगरमधील कलाकारांना लाभली, यासाठी त्यांना सर्व नगरकर रसिक, संगीतप्रेमी, तज्ज्ञांचे आशिर्वाद मिळाले.


आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना डॉ. उद्धव शिंदे. समवेत अभिनेता व मिस्टर इंडिया २०२० राज चामरे, फॅशन डिझायनर सुमैय्या पठाण, धनंजय जाधव, निखिल वारे, डॉ. सागर बोरुडे, राष्ट्रवादी ओबीसी सेलचे शहर जिल्हाध्यक्ष अमित खामकर, तुषार बोरुडे आदी.

# शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार नगरचे डॉ. उद्धव शिंदे यांना प्रदान

नगर - स्नेहबंध सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांना शिवछत्रपती गौरव पुरस्कार - २०२४ या पुरस्काराने आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते गौरवण्यात आले. नगर येथे झालेल्या कार्यक्रमात हा पुरस्कार वितरण सोहळा झाला. तुषार बोरुडे यांच्या वतीने विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान नागरिकांचा शिवछत्रपती गौरव पुरस्कार - २०२४ चा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

डॉ. उद्धव शिंदे यांच्या सामाजिक, शैक्षणिक कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. सन्मानचिन्ह व गौरवपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे. याप्रसंगी अभिनेता व मिस्टर इंडिया २०२० राज चामरे, फॅशन डिझायनर सुमैय्या पठाण, माजी नगरसेवक धनंजय जाधव, माजी नगरसेवक निखिल वारे, माजी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, राष्ट्रवादी ओबीसी सेलचे शहर जिल्हाध्यक्ष अमित खामकर आदी उपस्थित होते.

# परोपकार व नि:स्वार्थ भावनेने केलेले रक्तदान ही सर्वोपरि सेवा

### सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांचे प्रतिपादन; संत निरंकारी मिशन कडून 'मानव एकता दिवस' निमित्त अभियान, नगरमध्ये १७५ जणांनी स्वेच्छेने केले रक्तदान

नगर - रक्तदान ही मनुष्य जीवन वाचविण्यासाठी केली जाणारी एक अशी सर्वोपरि सेवा आहे. ज्यामध्ये परोपकाराची नि:स्वार्थ भावना निहित आहे. जेव्हा आमच्या मनामध्ये निष्काम सेवेचा भाव उत्पन्न होऊ लागतो, तेव्हा हे जग आणखी सुंदर दिसू लागते, असे उद्गार सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांनी दिल्ली येथे आयोजित 'मानव एकता दिवस' समारोहाच्यावेळी भाविक - भक्तांना संबोधित करतांना व्यक्त केले.


संत निरंकारी चॅरिटेल फाऊंडेशनच्या नगर शाखेच्यावतीने बाबा गुरबचनसिंहजी यांच्या स्मृतीदिनानिमित्त 'मानव एकता दिवस' व रक्तदान शिबीरचे आयोजित निरंकारी सत्संग भवन येथे करण्यात आले. यात १७५ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान केले. याप्रसंगी मंडळाचे नगर झोनल इंन्चार्ज हरिष खुबचंदानी आदी. दुसऱ्या छायाचित्रात दिल्लीतील रक्तदान शिबीरात रक्तदान करतांना राजपिता रमितजी समवेत सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज. (द्वारा - किशोर खुबचंदानी)

हेही सर्वविदित आहे की, निरंकारी जगतामध्ये 'मानव एकता दिवस' युगप्रवर्तक बाबा गुरबचन सिंहजी यांच्या प्रेरणादायी शिकवणूकीला समर्पित आहे, त्यांना श्रद्धासुमन अर्पित करण्यासाठी देशभर सत्संग समारोहाचे व विशाल रुपात रक्तदान शिबीराचे आयोजन केले जाते. रक्तदान शिबीरांची ही श्रृंखला वर्षभर चालू राहते.

संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशनच्या वतीने आजच्या दिवशी देशभरात जवळपास २०७ ठिाणी रक्तदान शिबीराचे आयोजन करुन अंदाजे ५० हजार युनिट रक्त संकलित करण्यात आले. दिल्लीतील बुराडी येथील रक्तदान शिबीरात निरंकारी राजपिता रमितजी यांनी रक्तदान करुन मिशनच्या भक्तांसाठी व युवा सेवादारांसाठी प्रेरणास्त्रोत बनले.

निरंकारी मिशनच्या या देशव्यापी महारक्तदान अभियानांतर्गत मंडळाच्या नगर शाखेच्यावतीने संत निरंकारी सत्संग भवन, सावेडी, नगर येथे आयोजित केलेल्या रक्तदान शिबीरात एकूण १७५ निरंकारी भक्तांनी व रक्तदात्यांनी स्वेच्छेने उत्स्फुर्तपणे रक्तदान केले यात महिलांची संख्याही लक्षणीय होती. सिव्हील हॉस्पिटलच्या रक्तपेढीने रक्त संकलनाचे कार्य केले. शिबीरास सामाजिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रातील अनेकांनी भेट देऊन मिशनद्वारे केल्या जाणाऱ्या नि:स्वार्थ सेवांचे कौतुक करीत शुभेच्छा दिल्या. नगर शाखेचे यंदाचे हे २७ वे वर्ष होते.

निरंकारी मिशनच्यावतीने १९८६ साली बाबा हरदेवसिंहजी महाराजांनी सुरु केलेल्या रक्तदान मोहिमेने महाअभियानाचे रुप धारण केले असून, या शिबीरांद्वारे आजपर्यंत जवळपास १४ लाख युनिट संकलित करुन गरजू रुग्णांसाठी रक्तपेढ्यांच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिले आहेत.

# सिध्दार्थ तागडने मिळवलेले यश शाळा व संस्थेसाठी भुषणावह

## ॲड. किशोर देशपांडे यांचे प्रतिपादन

नगर - सर्वसामान्य परीस्थिती असताना मिळवलेले यश नक्कीच भूषणावह बाब आहे योग्य नियोजन तसेच अभ्यासात सातत्य असल्यास यश मिळतेच सिध्दार्थ यांच्या यशाने शाळेचे नाव मोठे झाल आहे सिध्दार्थने केलेल्या कष्ट, मेहनतीचे हे फळ आहे हे यश विद्यार्थ्यांकरीता प्रेरणादायी आहे. सिध्दार्थ तागडने मिळवलेले यश शाळा व संस्थेसाठी भुषणावह आहे, असे प्रतिपादन माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग शालेय समिती चेअरमन ॲड. किशोर देशपांडे यांनी केले.


सावेडीतील श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेचा माजी विद्यार्थी सिध्दार्थ तागडने युपीएससी परीक्षा पास झाल्याबददल संस्था व शाळेच्या वतीने माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग शालेय समिती अध्यक्ष ॲड. किशोर देशपांडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. (छाया - उदय जोशी)

### माजी विद्यार्थी सिध्दार्थ तागडने युपीएससी परीक्षा पास झाल्याबद्दल संस्था व शाळेच्या वतीने सत्कार

सावेडीतील श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेचा माजी विद्यार्थी सिध्दार्थ तागडने युपीएससी परीक्षा पास झाल्याबद्दल संस्था व शाळेच्या वतीने माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग शालेय समिती चेअरमन ॲड. किशोर देशपांडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष भा. ल. जोशी, उपाध्यक्ष दिपक ओहोळ, सचिव तथा शालेय समिती अध्यक्ष सुरेश क्षीरसागर, सचिव प्र. स. ओहोळ, सचिन क्षीरसागर, स्वप्नील कुलकर्णी, मुख्याध्यापक दुर्योधन कासार, मुख्याध्यापिका संगीता जोशी, पर्यवेक्षिका वसुधा जोशी, श्री व सौ. तागड आदी उपस्थित होते.

भा. ल. जोशी म्हणाले की, सिध्दार्थच्या कामगिरीने नगरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. तागडने आपल्या क्षेत्रात एक चांगली व भरीव कामगिरी करावी हे यश शाळेकरिता भुषणावह व मुलांकरिता प्रेरणादायी आहे.ज्याप्रमाणे झाडांचे संगोपन करण्याकरीता माती, खत, शुध्द हवा यांची गरज असते. त्याप्रमाणे या यशात शाळा, शाळेचे शिक्षक, विद्यार्थी यांचाही मोलाचा सहभाग आहे.

सिध्दार्थ तागड म्हणाला की, सत्कार हा ज्या शाळेत शिकत होतो तेथे होणे निश्चितच आनंद देणारा आहे. कारण नेहमी कार्यक्रमात आम्ही समोर बसायचो परंतू आज माझा सत्कार होत असताना ज्यांनी मला घडवलं ते समोर बसले असताना सत्कार होत आहे. खऱ्या अर्थाने हा युनिक सत्कार आहे.

तागड म्हणाले की, आम्ही घेतलेल्या कष्टाचे आज चीज होत आहे. सिध्दार्थ हा करत असलेल्या मेहनतीच्या जोरावर तो यश मिळवत आहे. त्याच्या या यशात नगरकरांचे आशीर्वादही मिळत आहे. सिध्दार्थने असेच यश संपादन करावे.

प्रास्ताविकात मुख्याध्यापिका संगीता जोशी म्हणाल्या की, आम्ही ज्या विद्यार्थ्यांना शिकविले ते आज यश संपादन करत आहेत. यामुळे आमची मान नक्कीच उंचावली आहे. आम्ही घेतलेल्या कष्टाचे फळ मिळाल्याचा आनंद होत आहे.

# महेश नागरी पतसंस्थेस ६८ लाखांचा निव्वळ नफा

नगर - महेश नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, भिंगार या संस्थेने अंत्यत काटकसरीने व्यवहार करून नियमित कर्ज हप्ता भरणाऱ्यांना रिबेट देऊन संस्ेला २०२३-२०२४ यावर्षी एकूण निव्वळ नफा ६८ लाख रूपये मिळविलेला आहे, असे संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक शांतीलाल चंगेडे व उपाध्यक्ष शांतीलाल माणकचंद मुनोत यांनी संचालक मंडळ सभेमध्ये सांगितले.


डॉ.अशोक चंगेडे


शांतीलाल मुनोत

या सभेस संस्थेचे ज्येष्ठ संचालक सुंदरलाल सोहनलाल भंडारी, डॉ. श्रीकांत लक्ष्मीदास गांधी, रतिलाल सिमरतमल गुगळे, प्रकाशलाल मांगीलाल चोरडिया, राजेंद्र नवलमल शिंगवी, संजयकुमार माधवराव सपकाळ, बिपीनचंद्र बन्सीलाल लुणिया, किरण प्रकाश पतके तसेच व्यवस्थापक राजेंद्र लालचंद मेहेर आदी उपस्थित होते.

# २७ एप्रिलला १९ वर्षाखालील मुलींची क्रिकेट निवड चाचणी

नगर - महाराष्ट्र राज्य क्रिकेट असोसिएशन आयोजित निमंत्रित स्पर्धेसाठी अहमदनगर जिल्हा क्रिकेट असोसिएशन कडुन १९ वर्षाखालील मुलींची निवड चाचणी २७ एप्रिल रोजी वाडीया पार्क क्रिडासंकुल मैदान बॅंडमिटन हॉंल शेजारी जिल्हा क्रिकेट असोसिएशन अकादमी येथे घेण्यात येणार आहे.

इच्छुक मुलींनी या निवड चाचणीसाठी सकाळी ७ वाजता हजर रहावे. सोबत क्रिकेट साहित्य, क्रिकेट गणवेश, निवड चाचणीसाठी फी दोनशे रूपये राहिल. ज्या मुलींचा जन्म १/९/२००५ नंतर झाला असेल अश्याच मुलींना या निवड चाचणीत भाग घेता येईल. महिला खेळाडूंनी निवड चाचणीला सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रिकेट असोसिएशन अध्यक्ष अरुण जगताप यांनी केले.

# श्री रामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटीला ३ कोटी १४ लाखाचा निव्वळ नफा

नगर - श्री रामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटीला सर्व प्रकारच्या तरतूदी वजा जाता ३१ मार्च २०२४ अखेर ३ कोटी १४ लाख रूपयांचा निव्वळ नफा झाला आहे. तसेच संस्थेकडे वर्ष अखेर ८२.१० कोटी रूपयांच्या ठेवी असून कर्ज वितरण ५२.६३ कोटी रुपयांचे झाले आहे. उत्कृष्ट आर्थिक कामगिरीची परंपरा कायम राखण्यात संस्था यशस्वी झाली आहे, अशी माहिती संस्थेचे चेअरमन गोपाल मणियार यांनी दिली.


श्रीगोपाल धूत


गोपाल मणियार


मधुसुदन सारडा

संस्थेच्या संचालक मंडळाची सभा नुकतीच गोपाल माणियार यांचे अध्यक्षतेखाली पार पडली. संस्थेचे अंतर्गत लेखापरीक्षक सी.ए.एन. जे. लोहे ण्ड कंपनीचे सी.ए. पुनीत व्होरा यांनी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचा ताळेबंद सादर केला. सभेला संचालक श्रीगोपाल धूत, व्हा.चेअरमन मधुसूदन सारडा, राजेंद्र गुजराथी, लक्ष्मीकांत झंवर, ओमप्रकाश चांडक, प्रकाश गांधी, विश्वनाथ कासट, राजेंद्र मालू, , राजेंद्रकुमार कंत्रोड, ॲड. अशोक बंग, मथुराबाई झंवर, अनुरिता झगडे हे उपस्थित होते. तसेच व्यवस्थापक शशिकांत पुंडलिक व उपव्यवस्थापक अतुल डेरे हे देखील उपस्थित होते. सर्वांनी गोपाल माणियार व मधुसूदन सारडा यांचे अभिनंदन केले.

चेअरमन गोपाल माणियार म्हणाले की, संस्थेने इतर बॅंकेत ७९.४२ कोटी रुपयांची सुरक्षित गुंतवणूक केली आहे व इतर निधी ३२.१९ कोटी रुपये उपलब्ध आहे. तसेच संस्थेचा नेट एन.पी.ए. नेहमीप्रमाणे शून्य आहे. संस्थेचे संस्थापक चेअरमन श्रीगोपाल धूत यांचे बहुमोल मार्गदर्शन, शिस्तबद्ध व उत्कृष्ट कार्यपद्धती, व्हा. चेअरमन मधुसूदन सारडा व सर्व संचालकांचे योगदान यामुळेच संस्थेची सातत्याने प्रगती होत आहे. त्याचप्रमाणे संस्थेचे सभासद, ठेवीदार व कर्जदार यांच्या सहकार्यामुळेच भरीव कार्य करता आले. असेही त्यांनी सांगितले.

लक्ष्मीकांत झंवर यांनी सी.ए. पुनीत व्होरा यांनी संस्थेला वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल त्यांचे आभार मानले.

संस्थेकडून अल्पदरात कॅश क्रेडिट, टर्म लोन, वाहन कर्ज, आणि सोने तरण कर्ज फक्त ७ टक्के व्याजदराने दिले जाते. याचा सर्व ग्राहकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेच्या वतीने लक्ष्मीकांत झंवर यांनी केले. व व्हा.चेअरमन मधुसूदन सारडा यांनी सर्वांचे आभार मानले.


नगर-छत्रपती संभाजीनगर रोडवरील गजराजनगर येथे शिवराजे मित्र मंडळ, सूर्यपुत्र प्रतिष्ठानच्यावतीने पावन हनुमान मंदिरात जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी भागवताचार्य योगितातार्इ हजारे यांचे किर्तन झाले. याप्रसंगी भाविक. (छाया - विजय मते)

# रामभक्त हनुमान भारतीय संस्कृतीचे प्रतिक : हभप योगिता हजारे

नगर - प्रभु श्रीरामाचे एकनिष्ठ सेवक म्हणून श्री हनुमंतराया आहेत. या रायांनी आपले प्रभुराम-सीता आणि लक्ष्मण यांच्या सोबत राहून सेवा केली. या सेवेचे फळ हनुमंतरायांना मिळाले. आज प्रत्येक गावात मारुतीचे मंदिरे आहेत. एकवचनी, एकबाणी, एकपत्नी रामसोबत राहून सेवा केली, त्यांच्या पदरी हे पुण्य पडले. म्हणूनच 'हे अंजनीच्या सूता तुला रामाचे वरदान' असे म्हंटले जाते. त्यांची भक्ती ही आपल्याला प्रेरणादायी आहे, असे भागवताचार्य हभप योगितातार्इ हजारे यांनी किर्तनामधून सांगितले.

नगर-छत्रपती संभाजीनगर रोडवरील गजराजनगर येथे शिवराजे मित्र मंडळ, सूर्यपुत्र प्रतिष्ठानच्यावतीने पावन हनुमान मंदिरात जन्मोत्सव साजरा करण्यात आला. उत्सवाची सांगता रात्री किर्तन व महाप्रसादाने झाली.

याप्रसंगी बबलू सूर्यवंशी, दत्ता ताकपिरे, हभप शिवाजी पठारे, हभप दत्तात्रय शिंदे, संदिप परदेशी, राज आंबेकर, राकेश शिनगारे, दत्तात्रय बोराडे, शक्ती कांबळे, अतुल घाटे, कुणाल चव्हाण, अर्शद खान, तेजस कांडेकर, संकेत शिनगारे, किसन बोर्हाडे, साहिल कांडेकर, सनी मुसळे, अभिजित पाखरे, एकनाथ शिंदे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

हभप योगितातार्इ पुढे म्हणाल्या, हनुमान हे शक्तीशाली होते पण भक्ती देखील मोठी होती. श्रीरामांच्या भक्तीने त्यांची आपल्याला ओळख होते. रामनामाचे महत्व त्यांच्यामुळे आपण शिकलो. माणसाने फक्त संत-भगवंत यांनाच शरण जावे. कोणत्याही फळाची अपेक्षा न करता निष्ठा ठेवून सेवा करावी. माया जवळ केली कि भक्ती दूर जाते. हनुमान आपल्या सगळ्यांचे दैवत आहेत. त्यांची भक्ती करा, संकटे दूर होतील. रामराज्य येण्यासाठी हनुमंतरायांकडून शिकावे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी मृदूंगाचार्य कृष्णा महाराज सपकाळ, गायनाचार्य अभंग महाराज सोमवंशी यांनी किर्तनाला साथ-संगत दिली. महाप्रसादासाठी हेमंत पटेल यांचे योगदान लाभले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी गजराजनगरच्या तरुण कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

### अहमदनगर जिल्हा क्रिकेट असो.च्या मान्यतेने

# एस. के क्रिकेट ॲकॅडमी आयोजित एपीएल २०२४ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

SK CRICKET ACADEMY AHILYANAGAR

नगर - मुलांना बालवयातच क्रिकेट खेळाचे योग्य मार्गदर्शन मिळावे यासाठी अहमदनगर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने व एस के क्रिकेट ॲकॅडमीच्या वतीने १४ वर्षे आतील खेळाडूंसाठी एपीएल २०२४ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या माध्यमातून खेळाडू घडला जाईल, क्रिकेट खेळाला खूप महत्त्व प्राप्त झाले असून करिअर करण्याची संधी उपलब्ध झाली आहे तरी खेळाडूंना बालवयातच क्रिकेटचे धडे मिळावेत यासाठी एस के क्रिकेट अॅॅकॅडमीच्या वतीने जिल्हास्तरीय एपीएल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले असून १४ वर्षे आतील खेळाडूंनी नाव नोंदणी करण्यासाठी कराळे हेल्थ क्लब येथे फॉर्म उपलब्ध आहे.

तरी निवड चाचणीसाठी आपली नाव नोंदणी करावी, असे आवाहन एस के ॲकॅडमीचे संचालक क्रिकेटर संदीप आडोळे यांनी केले.

# दुकानदार, ग्रंथालय चालकांचा सत्कार करून पुस्तक दिन साजरा

### सीताराम सारडा विद्यालयातील शिक्षकांचा उपक्रम

नगर - जागतिक पुस्तकदिनी सीताराम सारडा विद्यालयाच्यावतीने नगर शहरात वाचन संस्कृती रुजवणाऱ्या पुस्तक दुकानदार, सार्वजनिक ग्रंथालयांचे ग्रंथपाल यांचा सत्कार करून व पुस्तक भिशीत शिक्षकांनी पुस्तक भिशित पुस्तके खरेदी करून पुस्तक दिन साजरा केला.


जागतिक पुस्तकदिनी सीताराम सारडा विद्यालयाच्यावतीने नगर शहरात वाचन संस्कृती रुजवणाऱ्या पुस्तक दुकानदार, ग्रंथपाल यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी उदय बुक स्टॉलचे विवेक कुलकर्णी, अभिरुची वाचनालय चळवळ चालवलेले शिरीष बापट, ललित बुक स्टॉलचे मनोहर लांडगे, अहमदनगर जिल्हा वाचनालयाचे अध्यक्ष शिरीष मोडक, ग्रंथपाल अमोल इथापे, नितीन भारताल यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, शाळेचे चेअरमन मकरंद खेर उपस्थित होते.

समाज म्हणून आपण या ग्रंथ प्रसार करणाऱ्या व्यक्ती व संस्थाविषयी कृतज्ञ असायला हवे यासाठी हा सन्मान करत आहोत असे मुख्याध्यापक हेरंब कुलकर्णी यांनी सांगितले.

याप्रसंगी शाळेत सुरू असलेल्या पुस्तक भिशी उपक्रमात भिशी लागलेल्या ६ शिक्षकांना प्रत्येकी ३६०० रुपयांची पुस्तके वितरीत करण्यात आली. वर्षभर शाळेत सुरू असलेल्या पुस्तक वाचन उपक्रमाने आम्ही शिक्षक म्हणून समृध्द झालो अशी भावना शिक्षक रविंद्र चोभे व शीतल शिंदे यांनी व्यक्त केली.

शिरीष मोडक यांनी पुस्तक दिनाच्या निमित्ताने केलेला सत्कार अभिनव असून पुस्तके समाजात पोहोचवणे हे महत्वाचे योगदान असल्याचे सांगून विल्यम शेक्सपियरची माहिती सांगितली. ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा व शाळेचे चेअरमन मकरंद खेर यांनी पुस्तक भिशी उपक्रमाचे कौतुक करून वाचन महत्वाचे असल्याचे सांगितले. शिरीष बापट व अमोल इथापे यांनी सत्कार केल्याबद्दल आभार व्यक्त करून पुस्तके पोहोचवण्याचे केलेले प्रयत्न सांगितले.

सूत्रसंचालन नितीन केणे यांनी केले. शाळेत एकही दिवस रजा न काढता वर्षभर कार्यरत असलेल्या सुजाता खामकर यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.


महावीर इंटरनॅशनलच्या वतीने भगवान महावीर स्वामींच्या जयंती निमित्त घेण्यात आलेल्या अहिंसा चित्रकला स्पर्धेस आदर्शऋषी महाराजांनी भेट देवून सर्व सहभागींना आशीर्वचनरुपी शुभेच्छा दिल्या.

# महावीर इंटरनॅशनलच्या 'अहिंसा' चित्रकला स्पर्धेस प्रतिसाद; अहिंसेचे विचार चितारण्यात नगरमध्ये रंगले शेकडो बालके

नगर - नगरच्या महावीर इंटरनॅशनलच्या वतीने नुकत्याच झालेल्या भगवान महावीर स्वामींच्या जयंतीचे औचित्य साधत अहिंसा या विषयावर चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. आचार्य आनंदऋषी महाराजांचे समाधीस्थळ आनंदधाम येथे झालेल्या स्पर्धेस बाल चित्रकारांचा प्रतिसाद मिळाला. अलोकऋषी महाराजांनी चित्रकला स्पर्धेस भेट देवून सर्व सहभागींना आशीर्वचनरुपी शुभेच्छा दिल्या. यावेळी नगर शाखेचे अध्यक्ष अरुण पारख, महिला अध्यक्षा वैशाली शेटिया, युवा अध्यक्ष स्वप्नील डुंगरवाल, मिरॅकलचे अध्यक्ष चेतन संचेती, निलेश बोथरा, शैलेंद्र कोठारी, नूतन संचेती, राणी पारख आदींसह सदस्य उपस्थित होते. स्पर्धेत सहभागी झालेले शेकडो स्पर्धक अहिंसेचे विचार कागदावर चितारण्यात रंगले होते.

यावेळी मार्गदर्शन करताना अलोकऋषी महाराज म्हणाले, स्पर्धेमुळे नव्या पिढीच्या बालकांना जैन समजाचे तीर्थंकर भगवान महावीर स्वामींच्या जीवनचरित्र्याचा परिचय होण्यास मदत होणार आहे. स्पर्धेचे आयोजन करून उत्कृष्ट उपक्रम हाती घेतला आहे. त्यामुळे मुलांची उन्हाळ्याची सुटी सार्थक लागणार आहे. भविष्यातही महावीर इंटरनॅशनलच्या वतीने महिला, पुरुष व बालकांचा उत्साह वाढण्यासाठी अशा विविध उपक्रमांचे आयोजन करावे. स्पर्धेत सहभागी सर्वांना व आयोजकांना सर्व जैन साधू साध्वींचे आशीर्वाद प्राप्त होतील, अशा शुभेच्छा दिल्या.

प्रास्ताविकात स्वप्नील डुंगरवाल यांनी विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. स्पर्धेत सहभागी बालकांनी भगवान महावीर स्वामींचा 'जिओ और जिने दो' हा बहुमूल्य संदेश आत्मसात करत अहिंसेचे विचार चित्राच्या रूपात कागदावर उतरवले आहेत. त्यामुळे बालकांना अहिंसेची शिकवण व महत्व पटल्याने ते पुढील जीवनातही अहिंसेचे पालन करतील.

स्पर्धेतील विजेत्यांची नावे कुंदनऋषी महाराज, आदर्शऋषी महाराज व अलोकऋषी महाराज यांच्या उपस्थितीत जाहीर करण्यात आला. स्पर्धेचा निकाल : लहान गट :- प्रथम : धानिष्का गुगळे, द्वितीय : दिशाली मुथा, तृतीय : भक्ती बरमेचा. उत्तेजनार्थ :- माही खिवंसरा व खुशी गुगळे. मोठा गट :- प्रथम : टीना पोखरणा, द्वितीय : रोहित उमाटकर व तृतीय : दिव्या कोठारी. विशेष पारितोषिक :- केसर छाजेड. सर्व विजेत्यांना आकर्षक पारितोषिके देण्यात आली.

# मानव सेवेत ईश्वरी सेवेचे व्रत जसपाल नारंग जोपासत आहेत

## प्रमोदकुमार छाजेड यांचे प्रतिपादन

नगर - स्वत:चा उद्योग, व्यवसाय सांभाळून गेल्या ३० वर्षांपासून सर्वसामान्य लोकांना समाज सेवा म्हणून मोफत होमिओपॅथी उपचार व औषधे देऊन मानव सेवेत, ईश्वरीय सेवेचे व्रत जसपाल नारंग जोपासत आहेत. या सेवेत पत्नी निता नारंग साथ देत आहेत. महाग होत चाललेल्या आरोग्य सेवेत आज सर्वसामान्यांना उपचार घेणे अवघड होत आहे, अशा परिस्थितीत जसपाल नारंग गरजूंना मोठा आधार ठरत आहेत. त्यांच्या हातून अशीच जनसेवा व्हावी, अशी आशा प्रमोदकुमार छाजेड यांनी व्यक्त केली.


जसपाल नारंग यांना 'डॉक्टरेट ऑफ फिलॉसॉफी'ने सन्मानित केल्याबद्दल स्नेह-७५ ग्रुपच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी निता नारंग, प्रमोदकुमार छाजेड, ईश्वर सुराणा, बाळासाहेब रेणाविकर, नारंग परिवार. (छाया - विजय मते)

सावेडी उपनगरातील प्रोफेसर चौक येथे जसपाल नारंग मोफत होमिओपॅथी उपचार करुन समजसेवा करत असल्याबद्दल त्यांना 'डॉक्टरेट ऑफ फिलॉसॉफी'ने सन्मानित केल्याबद्दल स्नेह-७५ ग्रुपच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी निता नारंग, प्रमोदकुमार छाजेड, ईश्वर सुराणा, बाळासाहेब रेणाविकर, नारंग परिवार उपस्थित होता.

जसपाल नारंग सत्कारास उत्तर देतांना म्हणाले, समाजात वावरताना आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो ही भावना ठेवून हे आरोग्य सेवेचे काम करत आहे. होमिओपॅथी उपचारामुळे अनेक रुग्णांना चांगला फायदा होत आहे. गेल्या ३० वर्षांपासून आपण ही सेवा करत आहोत.

आपल्या कार्याची दाखल एस.एस.ए. युनिर्व्हसिटी पोर्टलॅंड,यूएसए द्वारे होमिओपॅथी आणि सामाजिक क्षेत्रात करत असलेल्या कामाबद्दल 'डॉक्टरेट ऑफ फिलॉसॉफी' पदवी देऊन सन्मानित करण्यात आले याबद्दल स्नेह-७५ ने आपला सत्कार करुन या कार्यास प्रोत्साहनच दिले असल्याचे सांगितले.

स्नेह-७५ च्या वतीने नारंग यांचा केलेला हा सत्कार आम्ही विसरु शकणार नाही, असाच स्नेह त्यांनी ठेवावा, असे निता नारंग यांनी आभार व्यक्त करतांना म्हणाले.


डॉ.सुजय विखे पाटील यांचा भाजपा ओबीसी मध्य मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आ. संग्राम जगताप, भाजपा ओबीसी मध्य मंडळ उपाध्यक्ष सचिन पळशीकर, अध्यक्ष विक्रम शिंदे, सरचिटणीस सुशील थोरात, अर्पित अंकाराम, श्रीकांत म्याना, विशाल चिलाल, भैय्या अंकाराम, रोहित कडव, शुभम जाधव, अतिश अष्टेकर, ओंकार कुंटला, छोटू सामल, संजय कुलकर्णी, ओंकार सामल, अजिंक्य गुरावे आदी.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक

# विज्ञानवार्ता

## अमेरिकन ब्लॉगरला बंगळुरु टर्मिनलची भुरळ

अमेरिकन ब्लॉगर कार्ल रॉकने बंगळूरमधील केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळाचा आश्चर्यकारक व्हिडीओ शेअर केला आहे. कार्ल रॉकने या व्हिडीओत अनावरणासाठी सज्ज असलेल्या 'टर्मिनल २' वर फोकस ठेवला आहे. या टर्मिनलमधील आकर्षक डिझाईन व अत्युच्च दर्जाच्या सेवासुविधा लक्षवेधी ठरत असून, पर्यटक व वास्तूप्रेमींमध्येही याबद्दल औत्सुक्य दिसून आले आहे.



कार्ल रॉक आपल्या प्रवास वर्णनावर आधारित ब्लॉगसाठी विशेष ओळखले जातात. जगभरातील वेगवेगळ्या ठिकाणी भेटी देऊन ते विविध व्हिडीओ पोस्ट करत असतात. 'टर्मिनल २'मधील प्रतिभाशाली जगातील सर्वात खोल असा जलतरण तलाव दुबईत तयार करण्यात आला आहे. याची खोली ६० मीटर इतकी आहे. याला 'डीप डाईव्ह दुबई' या नावाने ओळखले जाते.

वास्तुशिल्प व सौंदर्यावर प्रत्येकजण प्रभावित होईल. हे जगभरातील सर्वात सुंदर विमानतळ असेल का, असे त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. बंगळुरातील टर्मिनल येथील प्रवेशद्वार तर आहेच; पण पायाभूत सेवासुविधा कशा कौशल्यपूर्ण व पर्यावरणाला अनुकूल असू शकतात, याचा उत्तम नमुना येथे दिसून येतो, याचाही यात उल्लेख आहे.

कार्ल रॉकने यावेळी आपल्या पोस्टमध्ये या टर्मिनल्सचे डिझाईन तयार करणाऱ्या स्किडमोड, ओव्हिंग्स अँड मेरिल एलएलपीचा विशेष उल्लेख केला आहे. कार्ल रॉकने हा व्हिडीओ पोस्ट केल्यानंतर काही कालावधीतच त्याला लाखापेक्षा अधिक व्ह्यूज मिळाले होते. ◆◆◆

## सर्वाधिक गारठणारे शहर !



भारतातील कानाकोपऱ्यात उष्ण तापमानाच्या झळा सुरू झाल्या आहेत. मात्र, जगभरात काही जागा अशाही आहेत, जेथे वर्षभर थंडी असते. या ठिकाणांवरील तापमान इतके कमी असते की, आपल्याकडे फ्रीजरमध्ये काही वेळा जसा बर्फ गोठलेल्या स्थितीत आढळून येतो, तसे चित्र या ठिकाणी अगदी रस्त्यारस्त्यांवर आढळून येते.

जगभरातील सर्वात थंड शहर म्हणून याकुत्सक शहराची ओळख आहे आणि ५ फेब्रुवारी १८९१ मध्ये येथे सर्वात थंड तापमान नोंदवले गेले होते. बीबीसीच्या सायन्स फोकस वेबसाईटनुसार, अंटार्क्टिकामधील डोम फुजी क्षेत्र देखील थंड हवामानासाठी ओळखले जाते. तेथील तापमान उणे ९३.२ डिग्री सेल्सिअस इतके मोजले गेले होते. या ठिकाणी रोज अगदी ४ तासभरही सूर्यप्रकाश मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. रशियातील याकुत्सक शहरातील तापमान जानेवारीदरम्यान उणे ६४.४ डिग्री सेल्सिअस इतके असते. केवळ आतासारख्या उष्ण दिवसात येथील तापमान २६ डिग्रीपर्यंत पोहोचते. जून व जुलै या महिन्यात येथे १३ डिग्री सेल्सिअसपर्यंत असते. पण, आश्चर्य म्हणजे इतके थंड हवामान असले तरी रशियातील सर्वाधिक सोने याच क्षेत्रातून काढले जाते. येथील नागरिकांसाठी बाहेर पडणे हेदेखील दिव्य असते. फ्रॉस्ट बाईटमुळे नाकाला चटकन इजा होऊ शकते. शिवाय, येथे मेटल फ्रेमचे चष्मेदेखील घालता येत नाहीत. असे चष्मे घातले तर ते त्वचेलाच चिकटून बसण्याची शक्यता बळावते. अशा थंड ठिकाणी स्नानासाठी तासन्तास तयारी करावी लागते. इतके कमी की काय म्हणून रात्रभर वाहनांचे इंजिनही सुरू ठेवावे लागतात. इंजिन सुरू ठेवले नाही तर तेथेही बर्फ जमतो आणि गाडी खराब होण्यास वेळ लागत नाही. ◆◆◆

## गुपित बर्फ तरंगण्याचे

आर्क्टिक महासागरात तरंगणारा बर्फाचा मोठा ताफा असो किंवा क्यूब्स बुडत का नाहीत, असा प्रश्न अनेकदा पडू शकतो. कारण बर्फाचे त्या तुलनेत वजन खूप असते आणि तरीही ते तरंगत राहतात. याचे संशोधकांनी दिलेले उत्तर औत्सुक्यपूर्ण आहे.

लाइव्ह सायन्सच्या रिपोर्टनुसार, मॅसॅच्युसेटस् इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्रोफेसर ब्रेट मिनचेव यावर बोलताना म्हणतात, बर्फ पाण्यात न बुडण्याचा पाण्याच्या घनतेशी संबंधित आहे. बर्फ ही पाण्याची घन अवस्था आहे. ते द्रव स्वरूपापेक्षा कमी दाट आहे. त्यामुळे ते तरंगते. याचाच दुसरा अर्थ असा की, त्याची घनता कमी असते.

नासाच्या हवामानशास्त्रज्ञ क्लेअर पार्किन्सन यांनी बर्फाचे तुकडे त्यांच्या आण्विक रचनेमुळे तरंगतात, असे यावेळी नमूद केले. ते म्हणाले, पाण्याचा एक रेणू दोन हायड्रोजन अणू आणि एक ऑक्सिजन अणूपासून बनलेला असतो. हायड्रोजन आणि ऑक्सिजन अणू इलेक्ट्रॉन सामायिक करतात. हायड्रोजनचा सकारात्मक चार्ज नकारात्मक ऑक्सिजन अणूकडे आकर्षित होतो. या रेणूंमध्ये बंध तयार होतो, त्याला हायड्रोजन बाँड म्हणतात. जेव्हा पाणी गोठले जाते, तेव्हा हे हायड्रोजन बाँड क्रिस्टल जाळी तयार करतात. या जाळीमध्ये बरीच रिकामी जागा असते, ज्यामुळे बर्फाची घनता कमी होते. त्यामुळेच जरी ते सुमारे १०० ते १६५ फूट जाड असले तरी हिमनग देखील समुद्रात तरंगतात. तरंगणाऱ्या बर्फामुळे सरोवरे आणि महासागरांच्या गोठलेल्या पृष्ठभागाखाली इतर जीवांना त्याचा त्रास होत नाही, ही देखील तितकीच महत्त्वाची बाब आहे. कारण हा बर्फ खाली बुडाला असता तर तर पाण्याखाली राहणाऱ्या प्राण्यांना मोठा त्रास झाला असता. नासाच्या म्हणण्यानुसार, समुद्राचा बर्फ गोठल्यावर त्यातून मीठ बाहेर पडते. यामुळे बर्फाखालील पाणी अत्यंत खारट आणि दाट होते. समुद्राच्या बर्फामुळे निर्माण झालेले हे पाणी समुद्राच्या तळाशी बुडते आणि खोल पाण्याला पुढे ढकलते. ◆◆◆



## मंगळ-पृथ्वीचे नाते

पृथ्वीपासून ग्रहाचे अंतर १४ कोटी मैल इतके आहे. मात्र, या दोन्ही ग्रहांमधील नाते हजारो वर्षे जुने आहे. यामुळे पृथ्वीच्या वातावरणावर हजारो वर्षांपासून याचा बराच प्रभाव पडत आला आहे, असा शोध ऑस्ट्रेलियन संशोधकांनी लावला आहे. समुद्रातील घडामोडींवर याचा कसा परिणाम होतो, याचे विश्लेषण करत त्यांनी हा निष्कर्ष काढला. सिडनी विद्यापीठातील संशोधकांनी असे नमूद केले की, प्रत्येक २४ लाख वर्षांत मंगळ ग्रह पृथ्वीला सूर्याच्या बाजूने खेचतो. पृथ्वी आणि मंगळ या दोन ग्रहात खेचण्याची आणि दूर करण्याची ही प्रक्रिया सातत्याने सुरू असते. यामुळे पृथ्वीवरील जलवायू प्रभावित होते आणि पृथ्वीवरील तापमान वाढते. ग्रह आपल्या कक्षेत दीर्घ वृत्ताकार कक्षेत फिरतात. यामुळे दोन्ही ग्रह ज्यावेळी एकमेकांच्या नजीक येतात, त्यावेळी अशी परिस्थिती निर्माण होते. ही प्रक्रिया ४ कोटी वर्षांपासून सुरू राहात आली आहे, असे या संशोधन पथकाच्या प्रमुख लेखिका डॉ. एडियाना इवीकविज यांनी म्हटले आहे.

संशोधकांनी यासाठी समुद्रात ३७० खोल छेद केले आणि या माध्यमातून होणारे बदल टिपण्यावर भर दिला. मंगळ व पृथ्वीवरील गुरुत्वाकर्षणामुळे महासागरांच्या तळाशी मोठी वादळे निर्माण होतात, असे यात त्यांना आढळून आले. यापूर्वी चंद्राच्या गुरुत्वाकर्षणामुळे समुद्रात बदल दिसून येतात, असे मानले जायचे. पण, नव्या अभ्यासात असे आढळून आले आहे की, सौर मंडळात अन्य ग्रह देखील पृथ्वीला प्रभावित करत असतो. ही प्रक्रिया मंगळ आणि पृथ्वीने सूर्याची परिक्रमा करण्याबाबत संलग्न राहात आली आहे. ◆◆◆



## जिमलाही सुवर्णझळाळी

जिम ही अत्याधुनिक, फॅन्सी तर असायलाच हवी. त्याचबरोबर त्या जिममध्ये दर्जेदार इक्विपमेंटस्, उत्तम ट्रेनर असणेही महत्त्वाचे असते. जिम म्हणजे भरपूर घाम घाळणे, मेहनत घेणे आणि शरीरयष्टी बनवणे इतकेच नव्हे तर याशिवायही तेथे अनेक आव्हाने असतात. दररोज वर्कआऊट करणाऱ्या लोकांचा फिटनेस व शारीरिक क्षमता अधिक असणे साहजिकच असते.


आता पारंपरिक जिमचे स्वरूपही जवळपास प्रत्येकाला ज्ञात असते. मात्र, एखादी सोन्या-चांदीने मढलेली जिम नजरेसमोर आणली तरी क्षणभर डोळे चमकल्याशिवाय राहणार नाही. आता सोन्या-चांदीने मढलेली ही जिम एखाद्या कोट्यधीशाची असेल, असे वाटून जाणे आणि त्यानंतर काही नावे नजरेसमोर येणे साहजिकच. पण, प्रत्यक्षात ही जिम केवळ कल्पनाचित्रापुरती मर्यादित आहे, ही वस्तुस्थिती आहे. एआय अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या माध्यमातून काही भन्नाट कल्पना स्क्रीनवर प्रत्यक्षात साकारल्या जातात. त्याचाच हा एक भाग आहे. तसे पाहता,

आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या माध्यमातून काहीही करणे शक्य असते. येथे कोणाचाही आवाज कोणालाही देता येतो. आपल्याला हवे तसे फोटो, व्हिडीओदेखील करता येते. याशिवाय ज्या गोष्टी अस्तित्वातच नाहीत, त्याचेही हुबेहूब कल्पनाचित्र रेखाटू शकतो. असाच एक फंडा एआयवर जिमबाबत राबवला गेला असून जिममधील साहित्य रत्नजडित, हिऱ्यापासून तसेच सोन्या-चांदीपासून तयार केलेले असते तर कसे दिसले असते, हे या पोस्टमध्ये शेअर करण्यात आले आहे. ◆◆◆

## द्वैभाषिक आईची मुले अतिप्रगल्भ ?

आई-वडिलांच्या संवाद पद्धतीचा मुलांवर बराच परिणाम होत असतो. एका संशोधनात असे आढळून आले आहे की, द्वैभाषिक मातांची मुले अधिक समंजस, अधिक प्रगल्भ असतात. दोन व त्याहून अधिक भाषांवर प्रभुत्व असणाऱ्या मातांची मुले केवळ एकच भाषेत बोलणाऱ्या मातेच्या मुलांच्या तुलनेत वेगवेगळ्या प्रकारच्या प्रतिक्रिया देतात आणि त्यांच्या मेंदूचा विकास अधिक वेगाने होतो, असे या संशोधनात म्हटले आहे.

या संशोधनातून असे आढळून येते की, अनेक भाषा ऐकणे हे जन्मापूर्वदिखील मुलांसाठी तितकेच महत्त्वाचे ठरत असते. भाषा आकलन जसे होत जाईल, तसा मेंदूचा विकास होत जातो. अगदी नवजात बाळामध्ये देखील आवाज ऐकल्यानंतर वेगवेगळ्या भाषांमधील अंतर समजून घेण्याची प्रक्रिया अप्रत्यक्ष रूपाने सुरु असते. जन्मापूर्वीही ध्वनी मेंदूच्या विकसनतेवर परिणाम करत असतो. संशोधकांनी यात दोन




व त्याहून अधिक भाषा बोलल्या जाणाऱ्या घरांमध्ये अभ्यासावर अधिक भर दिला आणि यात त्यांना चार महिन्यांच्या बाळांमध्ये अनेक सकारात्मक बदल दिसून आले.

द्वैभाषिक मातांची मुले अनेक प्रकारच्या आवाजांमुळे अधिक संवेदनशील होतात आणि यामुळे ते अधिक प्रतिक्रियाही देतात. द्वैभाषिक मातांचे आवाज समजून घेणे मुलांसाठी अधिक आव्हानात्मक असते आणि यामुळे ते अधिक दक्ष राहून ऐकण्याचा प्रयत्न करतात. याचा त्यांना मेंदूच्या प्रगतीत लाभ होतो, असे या अभ्यासात आढळून आले आहे.

जन्मापूर्वीच्या आवाजाचे अनुभव कसे प्रभावी ठरू शकतात, यावरही या संशोधनात भर देण्यात आला. आता अनेक भाषांमध्ये संवाद ऐकून त्यांना प्रतिक्रिया देणाऱ्या या बालकांमध्ये कौशल्य विकासाचे टप्पे कसे असतात, यावर देखील संशोधक अधिक प्रकाशझोत टाकण्यासाठी प्रयत्नशील असणार आहेत. ◆◆◆

## पृथ्वीचे पहिले छायाचित्र !



पृथ्वीच्या कक्षेत कार्यरत झाल्यानंतर हवामान उपग्रह इन्सॅट ३ डीएसने अत्याधुनिक पे-लोडच्या माध्यमातून पृथ्वीची काही छायाचित्रे टिपली आहेत. हा उपग्रह १७ फेब्रुवारी रोजी श्रीहरिकोटा येथून प्रक्षेपित करण्यात आला आणि २८ फेब्रुवारी रोजी कक्षेत पोहोचवला गेला होता. २९ फेब्रुवारीपासून ३ मार्चपर्यंत कक्षेतील आवश्यक चाचण्यांनंतर हा उपग्रह कार्यान्वित करण्यात आला. आपत्कालीन व्यवस्थापन व बचाव मोहीम राबवण्यासाठीही या उपग्रहाच्या माध्यमातून पुरवली जाणारी माहिती महत्त्वपूर्ण ठरू शकते, असा संशोधकांचा होरा आहे.

भारतीय अंतराळ संस्था इस्रोने उपग्रह कार्यान्वित झाल्याच्या वृत्तावर शिक्कामोर्तब केले. या उपग्रहाने ७ मार्च रोजी पृथ्वीचे पहिले छायाचित्र घेतले. उपग्रहावरील सर्व पे लोड सर्व निकषावर सर्वसाधारणपणे कार्यरत आहेत. या उपग्रहावर ७ चॅनेल इमेजर व १९ चॅनेल साऊंडर पेलोड आहेत. इन्सॅट ३ डीएसचे पेलोड यापूर्वीचे इन्सॅट ३ डी व इन्सॅट ३ डीआरच्या समसमान आहेत. यामध्ये रेडिओमॅट्रिक अचूकतेसह ब्लॅक बॉडी कॅलिब्रेशन, इमेजिंग आऊटपुट यात महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या आहेत. या उपग्रहाचे वजन २२७४ किलोग्रॅम इतके आहे.

या उपग्रहावरील पेलोड ६ चॅनेल इमेजर पृथ्वीच्या सर्व छटा टिपण्यासाठी सक्षम असून यामुळे आभाळ, तापमान, जल बाष्प व अन्य वायुमंडळीय घटनांबाबत सातत्याने तपशील मिळत राहणार आहेत. याचवेळी १९ चॅनेल साऊंड पेलोड ४० पेक्षाही अधिक जिओ फिजिकल डेटा तयार करणार आहे. या माध्यमातून हवामानाचा अंदाज व जलवायूचे निरीक्षण करणे शक्य होईल, असे प्राथमिक चित्र आहे. ◆◆◆

## तीन नव्या चंद्राचा शोध !

खगोलशास्त्रज्ञांनी आपल्या सौरमंडळात तीन नव्या चंद्रांचा शोध लावला आहे. यापैकी दोन चंद्र नेपच्यूनभोवती तर एक चंद्र युरेनसभोवती प्रदक्षिणा घालतो. आतापर्यंत हे चंद्र खगोलशास्त्रज्ञांसाठी अज्ञातच होते. हवाई आणि चिलीमधील शक्तिशाली दुर्बिणींचा वापर करून या छोट्या चंद्रांचा छडा लावण्यात आला. आंतरराष्ट्रीय खगोलीय संघाच्या (आयएयू) लघु ग्रह केंद्राने याबाबतची घोषणा केली.

या शोधामुळे आता नेपच्यूनभोवती फिरणाऱ्या चंद्रांची संख्या १६ तर युरेनसभोवती फिरणाऱ्या ज्ञात चंद्रांची संख्या २८ झाली आहे. वॉशिंग्टनमधील 'कार्नेगी इन्स्टिट्यूशन फॉर सायन्स'ने या संशोधनासाठी आपले योगदान दिले आहे. तेथील खगोलशास्त्रज्ञ स्कॉट शेफर्ड यांनी याबाबतची माहिती दिली. ते म्हणाले, नेपच्यूनच्या नव्या चंद्रांपैकी एकाची कक्षा अतिशय लांब आहे. सूर्यापासून सर्वात दूर अंतरावर असलेल्या नेपच्यूनच्या या चंद्राला आपली एक प्रदक्षिणा पूर्ण करण्यासाठी तब्बल २७ वर्षे लागतात. युरेनसभोवती फिरणारा नवा चंद्र हा या ग्रहाच्या चंद्रांपैकी कदाचित सर्वात छोट्या आकाराचा आहे. त्याचा व्यास केवळ आठ किलोमीटर असू शकतो. असे आणखीही काही छोटे चंद्र असू शकतात ज्यांचा अद्याप शोध लागलेला नाही, असेही त्यांनी सांगितले. आपल्या ग्रहमालिकेत बूध आणि शुक्र या ग्रहांना एकही चंद्र नसून पृथ्वीला केवळ एकच चंद्र आहे.

शनी आणि गुरू या दोन ग्रहांच्या चंद्रांची संख्या अतिशय मोठी आहे. शनी या ग्रहाला आपल्या सौरमंडळातील सर्वाधिक चंद्र असलेला ग्रह म्हणून ओळखले जाते. शनीच्या ज्ञात चंद्रांची संख्या तब्बल १४६ आहे. गुरू हा आपल्या ग्रहमालिकेतील सर्वात मोठा ग्रह असून त्याच्या चंद्रांची संख्या ९५ आहे. ◆◆◆







## तिबेटी बकऱ्यांचा क्लोन !

चीनने तिबेटी बकऱ्यांचा क्लोन तयार करत आणखी एक लक्षवेधी यश प्राप्त केले आहे. यापूर्वी १९९७ मध्ये चीनने मेंढीचे क्लोन तयार केले होते. शिवाय, वानराचे क्लोनिंगही केले गेले आहे. जगभरातील मेंढीच्या क्लोनिंगसाठी जे तंत्रज्ञान वापरले होते, तेच तंत्रज्ञान आता पुन्हा एकदा अमलात आणले जाणार आहे.

सोमेटिक सेल क्लोनिंग तंत्राचा त्यावेळी वापर केला गेला होता. या तंत्रानुसार, कोशिकाच्या केंद्रकाला स्थानांतरित केले गेले आणि त्यानंतर ते अंडे सरोगेट आईच्या गर्भात सोडले गेले. यानंतर बकऱ्यांच्या पिलात आधीचा कोणताही डीएनए आढळून आला नाही. चायना सेंट्रल टेलिव्हिजनने या नव्या तंत्राचा उल्लेख केला.

या नव्या तंत्रामुळे स्थानिक शेतकऱ्यांची मिळकत वाढेल आणि पशुपालन उद्योगाची प्रगती होईल, असा यामागील विचार आहे. हे तंत्रज्ञान वरकरणी सोपे वाटत असले, तरी प्रत्यक्षात साकारणे बरेच आव्हानात्मक असल्याचे मत संशोधकांनी मांडले आहे. ◆◆◆





## एक लिंबाची किंमत ३५ हजार !

तामिळनाडूच्या एका मंदिरात प्रथेनुसार दर वर्षी एका लिंबाचा लिलाव करण्यात येतो. यंदाही ही परंपरा पार पडली आणि यंदा या लिलावात एका लिंबाला थोडाथोडाका नव्हे तर चक्क ३५ हजार रुपये इतका दर मिळाला. सध्या सोशल मीडियावर याची बरीच चर्चा रंगली आहे.

तामिळनाडूमध्ये अलीकडेच इरोड इथल्या शिवगिरी गावात असलेल्या पझापूसियन मंदिरात दर वर्षीप्रमाणे यंदाही महाशिवरात्रीनिमित्त एका लिंबाचा लिलाव झाला. या मंदिरात महाशिवरात्रीला भगवान शंकरांना फळांचा नैवेद्य दाखवला जातो, तसेच अन्य पदार्थही नैवेद्यासाठी ठेवले जातात.

याच पदार्थांचा नंतर लिलाव केला जातो. यावर्षी जेव्हा भगवान शंकरांना अर्पण करण्यात आलेल्या लिंबावर बोली लागली, तीड ३५ हजारांपर्यंत पोहोचली आणि येथेच त्याचा लिलाव संपन्न झाला. महाशिवरात्रीच्या निमित्ताने या वेळी लिलावामध्ये बोली लावण्याची चढाओढ लोक करतात आणि मोठमोठ्या रकमेच्या बोली लावतात. सर्वाधिक बोली लावणाऱ्या भक्तावर महादेव प्रसन्न होतात आणि यामुळे त्याच्यावर कोणतेही संकट येत नाही, असे मानले जाते. ◆◆◆

## आगळेवेगळे हॉटेल

समुद्राखालील जग कसे असते, याची उत्सुकता प्रत्येकाच्या मनात असते. याच पार्श्वभूमीवर खोल समुद्रातील अभिजात ठेवा दर्शवणारा एक व्हिडीओ चर्चेत आला आहे. हा व्हिडीओ जगातील सर्वात महागड्या पाण्याखालील हॉटेलच्या एका रुममधील आहे. इन्फ्ल्यूएन्सर कपल कारा व नॅट यांनी इन्स्टाग्रामवर हा व्हिडीओ शेअर केला आहे.

कॉनरॉड मालदीव रंगाली आयलँड रिसॉर्टमध्ये द मुराका नामक हे हॉटेल समुद्राखाली १६ फुटांवर आहे. या हॉटेलमध्ये एक मास्टर बेडरूम, २४ तास बटलर, शेफ, स्पा ट्रिटमेंट, ऑन कॉल फिटनेस ट्रेनर व पर्सनल जेट स्की अशा सुविधा उपलब्ध आहेत.

या व्हिडीओची सुरुवात नॅटच्या हॉटेलचा रस्ता दाखवण्यापासून सुरू होते. लिफ्टमधून बाहेर येत ते हॉलमध्ये येतात आणि त्यानंतर शानदार बेडरूमचा नजारा दिसतो.

लक्झरी किंग साईज बेड, पर्सनल सिटिंग एरिया, सेंसर नियंत्रित वॉशरूम, वॉटर ग्लास सिलिंग व समुद्राची एक झलक दाखवत येथे राहणे आवडेल का, असा प्रश्न नॅट करते. हा व्हिडीओ शेअर केला गेल्यानंतर आतापर्यंत ७० लाखांहून अधिक नेटिझन्सनी पाहिला आहे. ◆◆◆



## परंपरा सेव्हिंग टाईम'ची

अमेरिका, कॅनडा, क्युबासह अनेक देशांमध्ये १० मार्चपासून डे लाईट सेव्हिंग टाईमची परंपरा सुरू होत असताना या देशांच्या घड्याळातील वेळ एक तासाने पुढे केली गेली आहे. दिवसाउजेडी असलेल्या प्रकाशाचा पुरेपूर उपयोग करून घेणे हा याचा मुख्य उद्देश असतो. यामुळे दैनंदिन कामकाजासाठी दिवसाचा अतिरिक्त वेळ मिळू शकतो आणि याचबरोबर विजेचीही बचत होते. डे लाईट सेव्हिंग टाईम आणि याची प्रक्रिया यामुळे नेहमी औत्सुक्याची ठरत आली आहे.

कोणत्याही देशातील प्रमाणवेळ एक तासाने मागे किंवा पुढे करण्याची प्रक्रिया ही डे लाईट सेव्हिंग टाईम या नावाने ओळखली जाते. काही ठिकाणी प्रत्येक सहा महिन्यातून एकदा ही प्रक्रिया केली जाते. उन्हाळ्यात घड्याळाचे काटे एक तासाने पुढे केले जातात. यामुळे दिवसातील उजेडाचा अधिक उपयोग करून घेता यावा, असा उद्देश असतो. त्यानंतर हिवाळ्यात



पुन्हा एकदा घड्याळ एक तासाने मागे आणले जाते.

ध्रुवांवर दिवस व रात्रीतील अंतर काही वेळा अधिक असते. यामुळे डीएसटीची (डे लाईट सेव्हिंग टाईम) गरज भूमध्य व कर्क तसेच मकर रेखावृत्ताच्या आसपास असलेल्या देशांना भासत नाही. ध्रुवाच्या नजीकच्या क्षेत्रात ठरावीक कालखंडात दिवस छोटे व रात्र मोठी तर काही कालखंडात दिवस मोठे व रात्र छोटी असते. त्या अनुषंगाने काही देश डीएसटीचा अवलंब करत आले आहेत.

डे लाईट सेव्हिंग टाईमची ही प्रक्रिया १९०८ मध्ये सर्वप्रथम कॅनडाने अवलंबली होती. त्यानंतर १९१८ मध्ये अमेरिकेने देखील त्याचे अनुकरण केले. आतापर्यंत जगभरातील ७० देशांमध्ये डीएसटीचा अवलंब केला जातो. अमेरिकेत मात्र सर्वच ठिकाणी याला मान्यता मिळालेली नाही. या प्रक्रियेमुळे आपल्या बॉडी क्लॉकवर परिणाम होतो, असे ऑक्सफर्ड विवीतील प्रो. रसल फोस्टर यांचा दावा आहे. डे लाईट सेव्हिंग टाईममुळे झोपेचा एक तास कमी होतो आणि यामुळे निद्रानाश, हृदयविकार, रक्तदाब, ताणतणाव, अल्झायमरसारखे विकार सुरू होतात, असे ते स्पष्टीकरणार्थ म्हणतात. ◆◆◆



बहुजन मुक्ती पार्टीचे नगर दक्षिणचे उमेदवार रावसाहेब काळे मिरवणुकीने उमेदवारी अर्ज भरण्यास जाताना.

## बहुजन मुक्ती पार्टीतर्फे रावसाहेब काळे यांचा उमेदवारी अर्ज दाखल



नगर – बहुजन मुक्ती पार्टीचे नगर दक्षिणचे उमेदवार रावसाहेब काळे यांनी गुरुवारी (दि.२५ एप्रिल) उमेदवारी अर्ज दाखल केला. शहरातून पारंपारिक वाद्यांसह मिरवणुक काढून महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन करण्यात आले. या रॅलात बहुजन मुक्ती पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थक सहभागी झाले होते.

जुने बस स्थानक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन रॅलीचे प्रारंभ झाले. माळीवाडा येथील महात्मा फुले व मार्केटयार्ड चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन शहरातून रॅली काढण्यात आली होती. जिल्हाधिकारी कार्यालय येथे प्रमुख पदाधिकाऱ्यांनी काळे यांचा उमेदवारी अर्ज जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केला. यावेळी बहुजन मुक्ती पार्टीचे जिल्हाध्यक्ष शिवाजी भोसले, भारत मुक्ती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सुभाष आल्हाट, छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष विनोद साळवे, ख्रिश्चन मोर्चाचे अजय देठे, बेरोजगार मोर्चाचे राहुल पगारे, मुस्लिम मोर्चाचे खालीद खान, बहुजन क्रांती मोर्चाचे युसुफ शेख, धडक जनरल कामगार संघटना श्रीधर शेलार, छत्रपती क्रांती सेनेचे उत्तम पवार, बी.एम.पी. चे ड. प्रकाश आदी उपस्थित होते.

रावसाहेब काळे म्हणाले की, लोकसभेत जिल्ह्याचे नेतृत्व करणारा खासदार हा सर्वसामान्यांतून आलेला व सर्वसामान्यांची प्रश्न मांडणारा असला पाहिजे. दक्षिणेत प्रभावी नेतृत्व मिळाले नसल्याने अनेक प्रश्न प्रलंबीत आहे. सर्वसामान्य कामगार, बेरोजगार युवक व शेतकऱ्यांसाठी माझी उमेदवारी आहे. नागरिकांसमोर शहराच्या नामांतरासारखे खोटे प्रश्न उभे करून दिशाभूल केली जात आहे. बेरोजगारी, महागाई, आरोग्य व शिक्षणाच्या प्रश्नावर बोलण्यासाठी उत्तर नसल्याने नागरिकांमध्ये भावनिक वातावरण निर्माण करण्याचे काम सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.

काळे यांच्या उमेदवारीस भारत मुक्ती मोर्चा इंडियन प्रोफेशनल असोसिएशन, राष्ट्रीय मुस्लिम मोर्चा, भारतीय बेरोजगार मोर्चा, बहुजन क्रांती मोर्चा, राष्ट्रीय किसान मोर्चा, छत्रपती क्रांती मोर्चा या सर्व संघटनेने पाठिंबा जाहीर केला आहे.

# केडगावकरांनो कोतकर परिवारसारखे माझ्यावरही प्रेम करा

### डॉ.सुजय विखे यांचे प्रतिपादन; माजी महापौर संदीप कोतकर यांचा केडगावकरांशी ऑनलाइन संवाद






केडगाव येथे संदीप दादा कोतकर युवा मंचच्या वतीने हनुमान जयंतीनिमित्त भंडारा वाटपाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे यांनी केडगावकरांशी संवाद साधला. (छाया – समीर मन्यार)

नगर – केडगाव व परिसराचा कोतकर परिवारामुळे विकास झाला. भानुदास कोतकर यांच्या पावलावर पाऊल ठेवत माजी महापौर संदीप कोतकर व उपमहापौर सुवर्णा कोतकर यांनी विकासकामांद्वारे केडगावचा चेहरामोहरा बदलला. विकसित केडगाव नगरच्या नकाशावर आणलं. उद्योजक सचिन कोतकर व सहकारी यांच्या माध्यमातून अधिक चांगले काम करू, असा विश्वास व्यक्त करून केडगावकरांनी कोतकर कुटुंबाला भरभरून प्रेम दिले. जनता पाठीशी असल्यास खरा विकास होतो हे कोतकर कुटुंबाने दाखवून दिले. केडगावकरांनी कोतकर कुटुंबावर मोठे प्रेम केले, तसेच प्रेम माझ्यावर करा. केडगावकरांच्या पाठीशी मी सदैव उभा आहे, असे प्रतिपादन महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे यांनी केले.

केडगाव येथे संदीप दादा कोतकर युवा मंचच्या वतीने हनुमान जयंतीनिमित्त भंडारा वाटपाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी डॉ. विखे यांनी केडगावकरांशी संवाद साधला. याप्रसंगी माजी महापौर बाबासाहेब वाकळे, उद्योजक सचिन कोतकर, जिल्हा बँकेच्या संचालिका सुरेखा कोतकर, निखिल वारे, शकुंतला पवार, माजी नगरसेविका सुनीता कांबळे, सविता कराळे, लताताई शेळके, साहेबराव विधाते, मनोज कोतकर, जालिंदर कोतकर, सुनील कोतकर, नीलेश सातपुते, भूषण गुंड, क्षीरसागरमहाराज, धनंजय जामगावकर, पंकज जहागिरदार, अभय भळगट, बाबा कोतकर, खाकाळ आदींसह नागरिक उपस्थित होते.

डॉ. विखे पुढे म्हणाले की, समाज सुरक्षित रहावा व वाढावा. आपल्या मुलांना उज्वल भविष्य मिळावं, यासाठी संधी मिळाल्यास सदैव प्रयत्नशील राहील, असे ते म्हणाले.

यावेळी माजी महापौर संदीप कोतकर यांनी ऑनलाइन केडगावकरांशी संवाद साधला. ते म्हणाले की, १९८७ पासून आजपर्यंत भानुदास कोतकर यांनी केडगावची बांधणी केली. केडगावची जनता कामगार आणि कष्टकरी आहे. रस्ता, वीज, पाणी ही मागणी जनतेची आहे. विकासकामांद्वारे केडगावच्या विकासाचा ठसा राज्यभरात उमटवला. आयुष्यात परीक्षा येत असते, ती संपते. कोणी कितीही आरोप करू द्या, जनतेला माहित आहे. विकासकामे महत्त्वाची आहेत. डॉ. विखेंच्या माध्यमातून राज्यात आणि केंद्रात आपल्याला डबल इंजिन मिळणार आहे. विखेंनी केडगावचे पालकत्व स्वीकारावं. विकासाची कामे केली तर नसती, तर केडगावकरांनी प्रेम केलं नसतं. आपले प्रश्न कोण सोडवू शकतो, याचा विचार नागरिकांनी करायला हवा. विखे परिवारावर विश्वास आहे. केडगावची श्रीरामाची सेना त्यांच्या पाठीशी आहे, असे ते म्हणाले.

उद्योजक सचिन कोतकर म्हणाले की, सुजय विखे यांचे हात केडगावकरांना बळकट करायचे आहेत. त्यांनी अनेक विकासाची कामे केडगावला केली. शंभर टक्के ते खासदार होणारच आहेत. पंधरा हजारापेक्षा जास्त लीड त्यांना केडगावमधून देऊन लोकसभेवर पाठवायचे आहे, असे ते म्हणाले. प्रास्ताविक साहेबराव विधाते यांनी केले. माजी नगरसेवक सुनील कोतकर व सुनील उमाप यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी राजेंद्र टाक यांनी हनुमान चालीसाचे पठण केले. मनोज कोतकर यांनी आभार मानले.





महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांनी सकाळी सावेडीतील जॉगिंग टॅकवर नागरिकांशी संवाद साधला. सूप्रभात ग्रुप, सावेडी उपनगर महिला ग्रुप, आदी सह क्रिकेट प्रेमी युवा वर्गाशी संवाद साधत तुफान फटकेबाजी केली. तसेच व्हॉलीबॉल, बॅडमिंटन खेळ खेळला नागरिकांनी आपल्या समस्या मांडल्या. (छाया– उदय जोशी)

# महाविकास आघाडीचे निलेश लंके यांनी साधला सावेडीतील जॉगिंग ट्रॅकवर नागरिकांशी संवाद

नगर – नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार निलेश लंके यांनी सकाळी सावेडीतील जॉगिग टॅकवर नागरिकांशी संवाद साधला. सूप्रभात ग्रुप, सावेडी उपनगर महिला ग्रुप आदी सह क्रिकेट प्रेमी युवा वर्गाशी संवाद साधत फटकेबाजी केली तसेच व्हॉलीबॉल, बॅडमिंटन खेळ खेळला. नागरिकांनी आपल्या समस्या मांडल्या. लंके यांना शुभेच्छा दिल्या. महिला व पुरुष नागरिकांनी लंकेसमवेत सेल्फी फोटो काढले.

यावेळी माजी महापौर भगवान फुलसौंदर, शिवसेना शहरप्रमुख संभाजी कदम, योगिराज गाडे, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर, अशोक दहीफळे, सुरेश क्षीरसागर, प्रकाश बोरूडे, सरोजिनी रच्चा, छाया बंडगर, प्रमोद वारूळे, प्रशांत ठोंबरे, राजगोरे, डॉ. कैलाश खंडेलवाल, रावजी नांगरे, रवि वाकळे आदी उपस्थित होते.



निलेश लंके यांच्यासमवेत सेल्फी काढताना महिला व पुरुष नागरिक. (छाया– उदय जोशी)

# सुजय विखे पाटील यांच्या उमेदवारी अर्जावर अपक्ष उमेदवाराची हरकत

### पदाचा दुरुपयोग करत लाभ मिळविल्याची केली तक्रार

नगर – नगर दक्षिण लोकसभा मतदार संघातून भाजपच्या वतीने उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या डॉ.सुजय विखे यांच्या अर्जावर अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केलेले शिवसेना ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख गिरीश जाधव यांनी २ मुद्द्यांवर हरकत घेत विखे यांचा उमेदवारी अर्ज बाद करण्याची मागणी निवडणुक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या कडे केली आहे.

लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी गुरुवारी (दि.२५) नगर दक्षिण लोकसभा मतदार संघासाठी २७ उमेदवारांनी ३२ उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. यापूर्वी उमेदवारी अर्ज दाखल केलेले १६ उमेदवार अशा प्रकारे उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्या एकूण उमेदवारांची संख्या ४३ एवढी झाली आहे. या दाखल अर्जांची छाननी शुक्रवारी (दि.२६) सकाळी ११ वाजेपासून सुरु झाली. या छाननी दरम्यान डॉ.सुजय विखे यांच्या अर्जावर गिरीश जाधव यांनी २ मुद्द्यांवर हरकत घेतली. विखे यांनी पदाचा दुरुपयोग करत त्यांच्या विळद घाट येथील संस्थेकडे देय असलेली नगर महापालिकेची पाणीपट्टीची रक्कम माफ करून घेतली.

तसेच त्यांच्या खाजगी संस्थेसाठी वन विभागाची सुमारे ५०० एकर जमीन बेकायदेशीर पणे संपादित करून घेतली असल्याने विखे यांचा उमेदवारी अर्ज बाद करावा अशी मागणी गिरीश जाधव यांनी केली. या हरकतीवर जिल्हाधिकाऱ्यांनी निर्णय राखीव ठेवला असून सायंकाळी ते निर्णय देणार आहेत. याबाबत आपण निवडणुक निरीक्षक यांची भेट घेवून तक्रार करणार असल्याचे जाधव यांनी सांगितले.



बहुजन समाज पार्टीच्यावतीने नगर दक्षिण लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करताना उमाशंकर यादव.

## बहुजन समाज पार्टीतर्फे उमाशंकर यादव यांचा उमेदवारी अर्ज दाखल



नगर – बहुजन समाज पार्टीच्या वतीने नगर दक्षिण लोकसभा निवडणुकीसाठी उमाशंकर यादव यांनी उमेदवारी अर्ज गुरुवारी (दि.२५ एप्रिल) दाखल केला.

पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह यादव यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे उमेदवारी अर्ज सुपुर्द केला. यावेळी जिल्हा प्रभारी सुनील ओहोळ, जिल्हा महासचिव मेजर राजू शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष शहानवाज शेख, सलीमभाई अत्तार, जिल्हा सचिव सुभाष साबळे, पक्षाचे दक्षिण लोकसभा अध्यक्ष शशिकांत नवगिरे, शहराध्यक्ष फिरोज शेख पत्रेवाला, महिला शहराध्यक्ष मनीषा जाधव, माजी शहराध्यक्ष प्रतीक जाधव, संतोष मोरे, गणेश बागल, जवाहर पठारे, शंकर वंजारे, राहुरी विधानसभा अध्यक्ष संजय संसारे, राहुरी शहराध्यक्ष रवी भालेराव, कोळगे, मनतोडे आदी उपस्थित होते.

उमाशंकर यादव पक्षाचे जिल्हाध्यक्ष असून, त्यांच्या राजकीय व सामाजिक कार्याची दखल घेऊन नुकतीच त्यांना पक्षाच्या वतीने उमेदवारी जाहीर झाली होती. उमाशंकर यादव म्हणाले की, बहुजन समाज पार्टीत सर्वसामान्यांच्या हातात नेतृत्व देण्याचे काम केले जात आहे. एका कंपनीतील कामगारांना पक्षाने उमेदवारी देऊन त्याच्या कार्यादी दखल घेतली आहे.

इतर पक्षात घराणेशाही सुरु असून, सर्वसामान्यांना संधी दिली जात नाही. प्रस्थापितांविरोधात बसपा लोकसभा निवडणुकीच्या मैदानात उतरली आहे. जिल्ह्यात सत्ताधारी व विरोधक फक्त राजकारणात मशगुल असल्याने त्यांना युवकांचा रोजगार, महिलांचे प्रश्न व इतर समस्या सोडविण्यात आलेल्या नाहीत. जिल्ह्यातील युवक आजही कामानिमित्त व शिक्षणासाठी मोठ्या शहरात जात आहे. जिल्ह्यातील नेत्यांनी फक्त स्वत:च्या शैक्षणिक संस्था उभ्या केल्या. मात्र सर्वसामान्यांच्या शिक्षणाची जाणीव त्यांना नाही. ही निवडणुक फक्त खोट्या घोषणा करून मतदारांची फसवणुक करणाऱ्यांविरोधात पर्याय म्हणून उमेदवारी करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तर भविष्यात जिल्ह्याच्या दृष्टीकोनाने उद्योगधंदे, युवकांचा रोजगार, महिलांचे प्रश्न व शिक्षणाच्या सोयी–सुविधांसाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# नाराजीनंतर आरपीआयने सुजय विखे पाटील यांच्या पाठिशी बांधली मोट

### महायुती सर्वांना बरोबर घेऊन बाबासाहेबांच्या विचाराने कार्य करत आहे : राधाकृष्ण विखे पाटील



महायुती घटक पक्ष असलेले आर.पी.आय.(आठवले गट)ने डॉ. सुजय विखे पाटील यांच्या पाठीशी ठाम राहण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी बोलताना महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील. समवेत श्रीकांत भालेराव, संजय भैलुमे, अजय साळवे, अमित काळे, जयाताई गायकवाड तसेच विविध तालुक्यांचे अध्यक्ष.

नगर – महायुतीचे घटक पक्ष असलेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाने मागणी केलेल्या लोकसभेच्या दोन जागेवरुन निर्माण झालेली नाराजी दूर झाली असताना, नगर दक्षिण लोकसभेचे महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रचारासाठी सर्व आरपीआयचे पदाधिकारी व कार्यकर्ते एकवटले. गुरुवारी (दि.२५ एप्रिल) कोहिनूर मंगल कार्यालयात महसुल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आरपीआयचे संपर्क प्रमुख श्रीकांत भालेराव यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक पार पडली. या बैठकीत पदाधिकारी व कार्यकर्त्यांना कोणत्याही भूलथापा व अफवांना बळी न पडता महायुतीच्या उमेदवाराच्या प्रचाराला कामाला लागण्याचे आवाहन करण्यात आले.

या बैठकीसाठी आरपीआयचे जिल्हाध्यक्ष संजय भैलुमे, उत्तर महाराष्ट्र सचिव अजय साळवे, युवक जिल्हाध्यक्ष अमित काळे, महिला जिल्हाध्यक्षा जयाताई गायकवाड, पाथर्डी तालुकाध्यक्ष बाबा राजगुरू, पारनेर तालुकाध्यक्ष राजेंद्र उबाळे, शेवगाव तालुकाध्यक्ष सतीश मगर, कर्जत तालुकाध्यक्ष नागेश घोडके, माजी नगर तालुकाध्यक्ष चंद्रकांत ठोंबे, माजी शहर जिल्हाध्यक्ष नाना पाटोळे, भिंगार शहराध्यक्ष मंगेश मोकळ, पाथर्डी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रवींद्र आरोळे, सुरेश भागवत, दया गजभिये, गौतम कांबळे, नगर महिला तालुकाध्यक्ष कविता नेटके, कुसुमसिंह, मंगल भिंगारदिवे, विद्या सोनवणे, राहुरी महिला तालुकाध्यक्ष स्नेहल सांगळे, हिराबाई भिंगारदिवे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, महायुतीचा घटक पक्ष म्हणून अनेक वर्षापासून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया भाजप बरोबर आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ना. रामदास आठवले यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्रात काम करण्याची संधी दिली. जागेच्या वाटपावरुन निर्माण आठवले यांची नाराजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भेट घेऊन दूर करण्यात आली आहे. महायुती सर्वांना बरोबर घेऊन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने कार्य करत आहे. महाविकास आघाडी सरकार सत्तेत असताना बाबासाहेबांच्या कोणत्याही स्मृती जतन करण्याचे काम केले नाही. महायुतीचे सरकार सत्तेत आल्यानंतर बाबासाहेबांचा महाराष्ट्रातील ठेवा जतन करण्यात आल्याचे स्पष्ट केले.

श्रीकांत भालेराव म्हणाले की, ना. आठवले यांच्या आदेशावरुन जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते महायुतीच्या उमेदवाराचे काम करणार आहे. वरिष्ठ पातळीवर झालेल्या बैठकीत आरपीआयला सत्तेत वाटा देण्याचे आश्वासन व जागा न दिल्याची उणीव भरून काढली जाणार असल्याचे आश्वासन देण्यात आलेले आहे.

सर्व आरपीआयचे कार्यकर्ते नगर दक्षिणेत विखे यांचे कार्य करणार असून, त्यांना राज्यात सर्वाधिक मतांनी निवडून आणण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे सांगितले. या बैठकीत पुढील आठवड्यात आरपीआयच्या जिल्हा मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याची घोषणा करण्यात आली. सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मेळाव्यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या दक्षिण जिल्हा कार्यकारिणी बरखास्त अथवा नवीन झालेली नाही. कार्यकारिणी बरखास्त करण्याची घोषणा करणाऱ्यांना पक्षाच्या घटनेप्रमाणे तो अधिकार नाही. निवडणुक काळात परिस्थिती संवेदनशील असताना पदाधिकाऱ्यांमध्ये फेरबदल करण्यात आलेला नाही. पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भूलथापांना बळी न पडता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आठवले यांच्या आदेशानुसार महायुतीच्या उमेदवारांचे काम करावे, असे आरपीआय संपर्क प्रमुख श्रीकांत भालेराव यांनी सांगितले.

# माध्यम कक्ष व आचारसंहिता कक्षास निवडणूक निरीक्षकांनी दिली भेट

### दोनही कक्षाच्या कामकाजाची केली पाहणी

नगर – लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात स्थापन करण्यात आलेल्या माध्यम कक्षास व आचारसंहिता कक्षास निवडणूक निरीक्षक (जनरल) रवी कुमार अरोरा व निवडणूक निरीक्षक (पोलीस) पी. अरवींदन यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पहाणी केली.

यावेळी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, अपर जिल्हाधिकारी तथा आचारसंहिता कक्षाचे नोडल अधिकारी सुहास मापारी, जिल्हा माहिती अधिकारी तथा माध्यम कक्षाचे नोडल अधिकारी डॉ. रवींद्र ठाकुर, कार्यकारी अभियंता अंकुश पालवे, माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीचे सदस्य महेश देशपांडे आदी उपस्थित होते.




माध्यम कक्ष व आचार संहिता कक्षास निवडणुक निरीक्षकांनी भेट दिली.

यावेळी निरीक्षकांनी सर्वप्रथम माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीच्या कामकाजाची पहाणी करत माध्यम कक्षात बसविण्यात आलेल्या दूरचित्रवाणी संचावरून विविध वाहिन्या, स्थानिक केबल वाहिन्यांवरून प्रसारित होणाऱ्या जाहिराती, बातम्या निरीक्षणाच्या कामाची पाहणी केली. कक्षात दररोज येणाऱ्या विविध वृत्तपत्रांतील बातम्यांच्या कात्रणाच्या संचाचीही निरिक्षकांनी यावेळी पाहणी केली.

आचारसंहिता कक्षाच्या कामकाजाची पहाणी करत लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने स्थापन करण्यात आलेल्या एसएसटी, व्हीएसटी, एसएसटी पथकांच्या कामांची माहिती जाणुन घेतली. या कालावधीत जप्त करण्यात आलेल्या रक्कमेची माहिती घेत याबाबतचा अहवाल सादर करण्याच्या सुचनाही त्यांनी यावेळी दिल्या. यावेळी आचारसंहिता कक्षाचे नोडल अधिकारी सुहास मापारी यांनी आचारसंहिता कक्षाच्या कामकाजाबाबत तर जिल्हा माहिती अधिकारी तथा माध्यम कक्षाचे नोडल अधिकारी डॉ. रवींद्र ठाकुर यांनी माध्यम कक्षाच्या कामकाजाबाबत निवडणूक निरीक्षकांना माहिती दिली.

## लोकसभा मतदारसंघासाठी निवडणूक निरीक्षकांच्या नियुक्त्या

नगर – लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने ३७–अहमदनगर लोकसभा मतदार संघासाठी निवडणूक निरीक्षक (जनरल) म्हणून रवी कुमार अरोरा, (आयएएस) यांची व निवडणूक निरीक्षक (पोलीस) म्हणून पी. अरवींदन (आयपीएस) यांची नियुक्ती केली आहे.

निवडणूक निरीक्षक (जनरल) रवी कुमार अरोरा, (आयएएस) यांच्याशी ९६९९७५५२५६ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे. निवडणूक कालावधीत निवडणूक निरीक्षक (जनरल) रवी कुमार अरोरा, (आयएएस) यांचा मुक्काम शासकीय विश्रामगृह, छत्रपती संभाजीनगर रोड, नगर येथे असणार आहे. निवडणूक निरीक्षक (जनरल) यांचे संपर्क अधिकारी म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अंकुश पालवे यांची नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांचा भ्रमणध्वनी क्र. ९८५०२१०७४० असा आहे.

निवडणूक निरीक्षक (पोलिस) पी. अरवींदन (आयपीएस) यांच्याशी ९०२२०७३०८७ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे. निवडणूक कालावधीत निवडणूक निरीक्षक (पोलिस) पी. अरवींदन (आयपीएस) यांचा मुक्काम वसंतकिर्ती पोलीस विश्रामगृह, तोफखाना पोलिस स्टेशन मागे, सावेडी येथे असणार आहे.

निवडणूक निरीक्षक (पोलिस) यांचे संपर्क अधिकारी म्हणून पोलिस निरीक्षक नंदकुमार धुमाळ यांची नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांचा भ्रमणध्वनी क्र. ९४२३५८३९५५ असा असल्याचे निवडणूक निरीक्षकांचे समन्वय अधिकारी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## मनपाचा सी.एफ.सी.सेंटर २७ व २८ एप्रिलला सुरु राहणार

नगर – महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १४० अ नुसार मालमत्ताकराची रक्कम आगाऊ भरण्यातून सर्व साधरण करात एप्रिलमध्ये १० टक्के मे व जुनमध्ये ८% सुट देण्यात येते. यानुसार एप्रिल महिन्यात मालमत्ताधारकांनी मालमत्ता कर भरण्यासाठी गर्दी होत असल्याने, मालमत्ता कर व पाणीपट्टी कर भरणे सुलभ होण्याच्यादृष्टीने प्रभाग समिती कार्यालयाकडील सर्व सी.एफ.सी. सेंटर २७ व २८ एप्रिल या सुट्ट्यांच्या दिवशीही चालु राहणार आहेत. तरी मालमत्ताधारकांनी या सवलतीचा लाभ घ्यावा.

## साध्वी विश्रुतविभाजी यांच्या दर्शनाचा लाभ घ्यावा



नगर – आचार्य महाश्रमणजी यांच्या शिष्या साध्वी प्रमुखा विश्रुतविभाजी आदी ठाणा १६ वसंत टेकडी येथील सुभाष भंडारी यांच्या निवासस्थानी २६ एप्रिल रोजी येत आहेत. त्यांच्या वंदन व दर्शनाचा लाभ सायं. ६ ते रात्री ८ या वेळेत भाविकांनी घ्यावा, असे आवाहन सुभाषलाल रमणलाल भंडारी (साजन–सजनी रेडिमेड कापड दुकानवाले) यांनी केले आहे.

## हनुमान जयंती मिरवणुकीत डीजे वाजवून ध्वनी प्रदुषण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

नगर – हनुमान जयंतीच्या दिवशी नगर शहरातून काढण्यात आलेल्या मिरवणुकीत डी जे वाजवून ध्वनी प्रदुषण केल्याप्रकरणी मंडळ अध्यक्षांसह डिजे मालकाविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अंमलदार योगेश खामकर यांनी फिर्याद दिली आहे. मंडळाचे अध्यक्ष साहिल मंगेश पवार (रा. घुमरे गल्ली, आझाद चौक, नगर) व डी जे मालक प्रतीक जालिंदर गायकवाड (रा. गिडेगाव ता. नेवासा) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. मंगळवारी (दि. २३) हनुमान जयंतीनिमित्त नगर शहरातून मिरवणूक काढण्यात आली होती. या मिरवणुकीत मंडळाचे अध्यक्ष पवार यांनी डिजे लावून ध्वनी प्रदुषण केले. बंदोबस्तावरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी वारंवार आवाज कमी करण्याबाबत सूचना देऊन सुध्दा त्याकडे दुर्लक्ष करून मोठ्या आवाजात गाणी वाजवून ध्वनी प्रदुषण केले.

